# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ०८/११/२०१७**

आज बुधवार दि. ०८/११/२०१७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०३ दि. २७/१०/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| २) | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| ३) | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| ४) | **भोईर सुनिता शशिकांत** | **सदस्या** |
| ५) | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| ६) | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| ७) | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| ८) | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| ९) | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| १०) | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| ११) | **शेट्टी गणेश गोपाळ** | **सदस्य** |
| १२) | **ढवण निलम हरीश्चंद्र** | **सदस्या** |
| १३) | **कदम अर्चना अरुण** | **सदस्या** |
| १४) | **नलावडे दिनेश दगडु** | **सदस्य** |
| १५) | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| १६) | **पाटील प्रभात प्रकाश** | **सदस्या** |
| १७) | **गुप्ता कुसुम संतोष** | **सदस्या** |
| १८) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| १९) | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| २०) | **रावल मेघना दिपक** | **सदस्या** |
| २१) | **शाह राकेश रतिशचंद्र** | **सदस्य** |
| २२) | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सदस्य** |
| २३) | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| २४) | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| २५) | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| २६) | **व्यास रवि वासुदेव** | **सदस्य** |
| २७) | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| २८) | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| २९) | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |
| ३०) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |
| ३१) | **परदेशी गिता हरीश** | **सदस्या** |
| ३२) | **पाटील नरेश तुकाराम** | **सदस्य** |
| ३३) | **सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन** | **सदस्या** |
| ३४) | **शेख अमजद गफार** | **सदस्य** |
| ३५) | **पाटील जयंतीलाल गुरूनाथ** | **सदस्य** |
| ३६) | **घरत तारा विनायक** | **सदस्या** |
| ३७) | **पांडे स्नेहा शैलेश** | **सदस्या** |
| ३८) | **आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र** | **सदस्य** |

| | | |
|---|---|---|
| ३९) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४०) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४१) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४२) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४३) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४४) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४५) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४६) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४७) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४८) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४९) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ५०) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५१) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५२) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५३) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५४) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५५) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५६) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५७) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५८) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५९) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६०) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६१) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६२) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६४) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६५) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६६) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६७) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६८) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६९) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७०) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७१) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७२) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७३) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ७४) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ७५) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७६) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ७७) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ७८) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७९) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ८०) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ८१) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ८२) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ८३) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ८४) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ८५) | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| ८६) | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |
| ८७) | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |
| ८८) | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| ८९) | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |
| ९०) | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १) | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| २) | **जैन सुनिता रमेश** | **सदस्या** |
| ३) | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| ४) | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |

**रजेचा अर्ज -**

| | | |
|---|---|---|
| १) | **म्हात्रे परशुराम पदमाकर** | **सदस्य** |

**रोहिदास पाटील :-**

मा. उपमहापौरांना विनंती करतो की त्यांनी पिठासीन व्हाव आणि सभेचे कामकाज सुरु करावे. सर्व सन्मा. सदस्यांना माहिती देतो की एका विषयावर महापौर दालनामध्ये आयुक्त, महापौर यांची मिटींग सुरु आहे. त्यामुळे आपले कामकाज आपण चालु करुया.

**अशरफ शेख :-**

काका महत्वाची महासभा आहे आणि ह्या महासभेमध्ये तुम्ही मिटींग ठेवत आहेत.

**रोहिदास पाटील :-**

महासभेच्या संबंधित विषय आहे.

**अशरफ शेख :-**

१५ मिनिटे तहकुब करा ना. येऊ दे त्या लोकांना १५ मिनिटे आपण तहकूब करु.

**जुबेर इनामदार :-**

महापालिकेमध्ये सन्मा. महापौर आलेले असले तर आपल्याला १५ मिनिटे सभागृह तहकुब करता येईल.

**रोहिदास पाटील :-**

तहकुब करायचा प्रश्न येत नाही.

**अशरफ शेख :-**

काका आम्ही थांबायला तयार आहोत.

**अनिल सावंत :-**

महापौर आलेले आहेत, आयुक्त आलेले आहेत सभागहासंबंधित विषयाची मिटींग आहे म्हणता मग सभागृहाच्या सदस्यांना कळायला पाहिजे ना कुठची मिटींग आहे काय आहे. मिटींग चालु करायला म्हणता. विषय कुठला आहे ह्या सभेपेक्षा मोठा विषय आहे का?

**रोहिदास पाटील :-**

ह्या सभेपेक्षा मोठा विषय नाही.

**अनिल सावंत :-**

सभा सुरु करायला पाहिजे महापौरांचा अपमान करत आहोत. तुम्ही मा. महापौर आलेले आहेत. इमारतीमध्ये त्यांनी येऊन सभा चालु करायला पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

असे आहे की आजच्या सभेपुढे अत्यंत महत्वाचे कामकाज आहेत. महापौर मॅडम ह्या प्रिमायसेसमध्ये आहेत आणि मिटींग त्याच चालु करणार होत्या थोड्या वेळाने ते येतील प्रश्न असा आहे की ह्या सभागृहाच्या सन्मा. सदस्या नयनाताई म्हात्रे यांच्याकडे सफाई कर्मचाऱ्यांबरोबर स्वच्छतेवरुन काहीतरी विवाद झाले आणि त्यांच्या विरोधात अत्यंत घृणास्पद अशी भाषा वापरली गेली ह्या संदर्भात नयनाताई म्हात्रे यांनी तक्रार दाखल केलेली आणि त्या तक्रारीला अनुसरुन त्या कर्मचाऱ्याला इथुन हटविण्याचे धोरण ठरविण्यांत आल आयुक्तांकडे ते प्रकरण गेल आणि अशा वेळेला श्रमजीवी संघटनेच्या युनियनने ह्या शहरामधल्या संपूर्ण साफसफाईचे कामकाज बंद केलेले आहे. आणि हे कामकाज त्यांनी बंद केलेले आहे. श्रमजीवी संघटनेचे सन्मा. अध्यक्ष विवेक पंडित साहेब आलेले आहेत. भाऊ आलेले आहेत आयुक्त साहेब महापौर मॅडम आणि विवेक पंडित साहेब यांची चर्चा सुरु आहे. ही चर्चा संपली ह्या कामातुन तोडगा निघाला की पुढचे कामकाज त्या करणार आहेत. म्हणून आजच्या सभेचे कामकाज सुरु करावे असे सचिवांना विनंती करतो.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी ह्या सभागृहामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एक इतिहास दडलेला आहे. सन्मा. तुळशीदास म्हात्रे साहेब महापौर होते. जयंत पाटील उपमहापौर होते, तुळशीदास म्हात्रे साहेब पालिकेच्या इमारतीमध्ये उपस्थित असताना...............

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य सभेला सुरुवात होऊ दे. मग आपण सुरुवात करा. सचिवांना सभेला सुरुवात करु द्या. मग आपण बोला.

**जुबेर इनामदार :-**

पिठासीन अधिकारी साहेब ह्या सभेच्या सुरुवातीसाठीच गरजेचे आहे.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही नाही करणार सचिव करतील तुम्ही नंतर बोला तुम्हाला थांबवणार नाही. तुम्हाला बोलायचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

सभेत सर्व सदस्यांना अधिकार आहे त्यांचा विषय मांडू शकतात.

**मा. उपमहापौर :-**

सभेला सुरुवात होऊ द्या. त्यानंतर तुम्ही बोला. सचिव सभेला सुरुवात करा.

**जुबेर इनामदार :-**

त्या सभेला युडीने रद्द केल होते झालेले ठराव रद्द झाले होते. कारण तो नियमबाह्य झालेली सभा होती. महापौर इमारतीमध्ये उपस्थित असताना उपमहापौरांना पिठासीन करुन सभा चालविण्यात आली होती. मी फक्त ही विशेष ऑन द हाऊस चर्चेमध्ये समक्ष आणुन दिलेली आहे.

**प्र. नगरसचिव :-**

पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने राष्ट्रगीतासाठी सर्व सदस्यांनी जागेवर उभे रहायचे आहे.

**दिनेश नलावडे :-**

उपमहापौर साहेब सभेला सुरुवात करण्याच्या अगोदर ह्या विषयाला आपण हात घातलात. श्रमजीवी कामगार संघटनेच्या बाबतीत हे कामगार आम्हालाही नगरसेवकांना कालपासून लेटर देत आहेत आणि त्यांच्या तक्रारी आमच्याकडे मांडत आहेत आणि ती जर मिटींग खाली होत असेल सभागृह सोडून तर कृपया आमची विनंती आहे आपल्याला की आपण हा विषय थोडासा सभागृहालाही जाणून घेणारा आम्हाला माहिती पडावी. कारण की हा अतिशय निंद्य असा प्रकार होत आहे आणि आपल्यासाठी नगरसेवकांच्यासाठी ह्या महासभेसाठी ठिक नाही. याची चर्चा आपण थोडीशी सभागृहात करण्यात यावी ही विनंती करतो.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम त्या विषयावर चर्चा करायला बसल्या आहेत त्या आल्यानंतर ह्या विषयावर आपण चर्चा करू. त्याचा काय तोडगा निघतो ते आपण बघू या.

**प्र. नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. 08/11/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. 03 मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भारतातील महाविद्यालयांचे व विद्यापिठाचे मुल्यांकन "नॅक" मार्फत केले जाते. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या वतीने हि परिषद ख्यातनाम शिक्षण तज्ञ समिती गठीत करते. या समितीने आपल्या शहरातील मान्यवर शंकर नारायण कला आणि वाणिज्य महाविद्यालयास भेट दिली. सर्वांगीण पायाभूत सुविधा व शैक्षणिक प्रगतीचे आणि प्राध्यापकांच्या शैक्षणिक अर्हता व संशोधन आदी बाबींचे प्रत्यक्ष पाहणी केली. अत्यंत पारदर्शक व निःपक्षपतीपणे मुल्यांकन करुन समितीने शैक्षणिक दर्जा व गुणवत्तेच्या अनुषंगाने अहवाल राष्ट्रीय मुल्यांकन परिषद बंगलोर येथे पाठविला होता. केंद्र शासनाच्या मनुष्यबळ अख्यात्यातील "नॅक" या समितीने मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील प्रतिष्ठीत "अ" श्रेणी प्रदान केली आहे. हा मान फारच थोड्या महाविद्यालयांना प्राप्त झाला आहे. मिरा भाईंदर हद्दीतील मान मिळालेले पहिले विद्यालय आहे. आपल्या सभागृहाचे ज्येष्ठ नगरसेवक आणि सभागृह नेते श्री. रोहिदास पाटील हे या महाविद्यालयाचे संचालक आहेत व अन्य त्यांचे सहकार्याचे या यशात सहभाग व अमुल्य योगदान आहे. सभागृहास या नेत्रदिपक यशाबद्दल आनंद व सार्थ अभिमान वाटत आहे. मिरा भाईंदर शहरास यामुळे गौरव प्राप्त झाला आहे.

करीता, हि सभा या कार्यकर्तृत्वाची गौरवपूर्ण नोंद घेत आहे. या महाविद्यालयाच्या आपल्या यशाचा मार्ग असाच उत्तरोत्तर चढत्या क्रमाने प्रज्वलित करावा असे हि सभा सुयश चिंतिते आणि अभिनंदनाचा ठराव एकमताने पारित करीत आहे.

**गिता जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर शहरातील श्री. समीर शेख रा. मिरारोड (पु.) हे भारतीय पोलिस सेवा या परिक्षेचा नुकताच निकाल जाहिर झाला असून स्पर्धात्मक यु.पी.एस.सी. परिक्षेतून मिरा भाईंदर शहराचे रहिवासी श्री. समीर शेख उत्तीर्ण झाले आहे. ही बाब मिरा भाईंदर वासियांकरीता अभिमानास्पद असून मिरा भाईंदर शहरातील स्थानिक नागरीक या नात्याने आपण परिश्रमाने प्राप्त केलेल्या या यशाने शहराचे नावलौकीक वाढविले आहे. आपण संपादन केलेल्या यशाबद्दल सभागृह आपले मनःपूर्वक अभिनंदन व्यक्त करीत आहे तसेच आपल्या भविष्यातील पुढील शैक्षणिक वाटचालीकरीता सुयश चिंतीत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**शानु गोहिल :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्र.नगरसचिव :-**

केंद्र शासनाच्या मनुष्यबळ अखत्यरितील ज्ञात ज्या समितीने मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीतील प्रतिष्ठीत "अ" श्रेणी प्रदान केली आहे . हा मान थोडक्यात महाविद्यालयांना प्राप्त झाला आहे. मिरा भाईदर हद्दीतील मान मिळालेले पहिले विद्यालय आहे. आपल्या सभागृहाचे ज्येष्ठ नगरसेवक आणि सभागृह नेते रोहिदास पाटील हे ह्या महाविद्यालयाचे संचालक आहेत तरी ह्या संचालक श्री. रोहिदास पाटील सभागृह नेते ह्यांना सत्कार समारंभासाठी डायस वर बोलविण्याची विनंती करण्यात येत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपमहापौर, मा, उपायुक्त, मा. सचिव, सन्मा. सर्व नगरसेवक, नगरसेविका पत्रकार बंधु प्रेक्षक गॅलरीतील सर्व अत्यंत आनंद होत आहे. मी आपला ॠणी आहे. अनेक वर्ष सभागृहात आहे. अनेक वर्ष शिक्षण क्षेत्रात काम करतो. शंकर नारायण महाविद्यालय उभे राहते वेळी ह्या सभागृहात मी अनेक सदस्य पहिल्या दिवसाचे साक्षिदार आहेत. अत्यंत कठीण परिस्थितीत विद्यालय उभे राहीले. आम्हाला सांगायला आनंद होत आहे की ह्या सभागृहातले आजी माजी सदस्य, अधिकारी, पदाधिकारी, आमदार, खासदार ह्या सर्व लोकांनी शहरातील प्रतिष्ठित नागरिकांनी शिक्षण प्रेमी नागरीकांनी वेळोवेळी सहकार्य केल. आर्शिवाद दिले, मार्गदर्शन केले आणि त्याचा परिणाम ही गोष्ट खरी आहे की आपण सर्वाना आनंद आहे शंकर महाविद्यालय "अ"दर्जा मिळाला हे ज्यावेळी समजले त्यावेळी मिरा भाईदर मधीलच नाही तर पूर्ण शिक्षण क्षेत्रातील सर्व लोकांना एक नवोदित म्हणजे अनेक वर्षाचे अनेक कॉलेजेस आहेत पण त्यांना "अ" दर्जा प्राप्त झाला नाही. होतच नाही असे नाही. कमी लोकांना होतो आणि मिरा भाईदर मधील शंकर नारायण महाविद्यालयाला "अ" दर्जा मिळाला मी आपल्या सर्वाचा ऋणी आहे. अपेक्षा करतो की ह्या महाविद्यालयाच्या वाटचालीमध्ये सभागृहात असलेले सर्व सदस्य ह्या महापालिकेचे सर्व अधिकारी पूढेही मार्गदर्शन, आर्शिवाद देत राहतील पुन्हा एकदा आपल्या सर्वाचे धन्यवाद.

**मा. उपमहापौर :-**

ह्या सभागृहात आणखी एक अभिनंदनाचा ठराव करण्यात आलेला . मिरा भाईदर शहरातील समिर शेख राहणार मिरारोड पूर्व हे भारतीय पोलीस सेवा ह्या परिक्षेच्या निकालामध्ये यू.पी.एस.सी. तून मिरा भाईदर मधून पहिले आले होते. आणि त्यांचाही सत्कार ह्या सभागृहात करायचा होता परंतू माहिती घेतली असता ते ट्रेनिंगसाठी बाहेर गेलेले आहेत. ते ह्या शहरात आल्यानंतर त्याचा ह्या सभागृहात बोलवून गौरव करण्यात येणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईदर महानगरपालिकेचे ज्येष्ठ समाजसेवक मी त्यांना राजकीय नेते कधीच बोलणार नाही. समाजसेवक समाज कार्याच्या चळवळीमधून पूढे येऊन त्यांनी राजकारणामध्ये यश प्राप्त केले त्यांनी ह्या शहराला एक सुंदर विद्यालय शंकर नारायण विद्यालय त्यांनी त्याची स्थापना केली. शहराला गौरव प्राप्त झालेला आहे होत आहे. त्याच्यामूळे मी कॉग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचे अभिंनंदन करू इच्छितो. आणि त्यांना शुभेच्छा देतो की त्यांनी अशाचप्रकारे ह्या शहराचा गौरव त्या विद्यालयाच्या माध्यमातून वाढत जावो धन्यवाद.

**निलम ढवण :-**

मिरा भाईदर शहरामध्ये अग्रस्थानी असलेले असे आणि सर्वाच्या परिचयांचे आणि सर्वाना जवळचे वाटणारे असे शंकर नारायण कॉलेज जे अत्यंत चांगल्या प्रकारे ज्ञानदानाचे कार्य करत आहे. आणि त्यांचे संस्थापक आमचे लाडके काका आदरणीय रोहिदासजी पाटील ह्यांच्या आतापर्यतच्या पूर्ण मेहनतीचे श्रेय त्यांना आहे. अ श्रेणी मिळून बहाल झालेल आहे आणि मनःपुर्वक शिवसेनेच्या वतीने मी त्यांचे अभिनंदन करते. आणि अशाच पध्दतीने गौर गरिब मुलांना नेहमी प्रमाणे साथ देऊन पूढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देतो. धन्यवाद.

**अभिनंदन ठराव क्र. १३अ :-**

भारतातील महाविद्यालयांचे व विद्यापिठाचे मुल्यांकन "नॅक" मार्फत केले जाते. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या वतीने हि परिषद ख्यातनाम शिक्षण तज्ञ समिती गठीत करते. या समितीने आपल्या शहरातील मान्यवर शंकर नारायण कला आणि वाणिज्य महाविद्यालयास भेट दिली. सर्वांगीण पायाभूत सुविधा व शैक्षणिक प्रगतीचे आणि प्राध्यापकांच्या शैक्षणिक अर्हता व संशोधन आदी बाबींचे प्रत्यक्ष पाहणी केली. अत्यंत

पारदर्शक व निःपक्षपतीपणे मुल्यांकन करुन समितीने शैक्षणिक दर्जा व गुणवत्तेच्या अनुषंगाने अहवाल राष्ट्रीय मुल्यांकन परिषद बंगलोर येथे पाठविला होता. केंद्र शासनाच्या मनुष्यबळ अख्यात्यातील ''नॅक'' या समितीने मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील प्रतिष्ठीत ''अ'' श्रेणी प्रदान केली आहे. हा मान फारच थोड्या महाविद्यालयांना प्राप्त झाला आहे. मिरा भाईंदर हद्दीतील मान मिळालेले पहिले विद्यालय आहे. आपल्या सभागृहाचे ज्येष्ठ नगरसेवक आणि सभागृह नेते श्री. रोहिदास पाटील हे या महाविद्यालयाचे संचालक आहेत व अन्य त्यांचे सहकार्याचे या यशात सहभाग व अमुल्य योगदान आहे. सभागृहास या नेत्रदिपक यशाबद्दल आनंद व सार्थ अभिमान वाटत आहे. मिरा भाईंदर शहरास यामुळे गौरव प्राप्त झाला आहे.

करीता, हि सभा या कार्यकर्तृत्वाची गौरवपूर्ण नोंद घेत आहे. या महाविद्यालयाच्या आपल्या यशाचा मार्ग असाच उत्तरोत्तर चढत्या क्रमाने प्रज्वलित करावा असे हि सभा सुयश चिंतिते आणि अभिनंदनाचा ठराव एकमताने पारित करीत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्रीम. गिता जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अभिनंदन ठराव क्र. १३ब :-**

मिरा भाईंदर शहरातील श्री. समीर शेख रा. मिरारोड (पु.) हे भारतीय पोलिस सेवा या परिक्षेचा नुकताच निकाल जाहिर झाला असून स्पर्धात्मक यु.पी.एस.सी. परिक्षेतून मिरा भाईंदर शहराचे रहिवासी श्री. समीर शेख उत्तीर्ण झाले आहे. ही बाब मिरा भाईंदर वासियांकरीता अभिमानास्पद असून मिरा भाईंदर शहरातील स्थानिक नागरीक या नात्याने आपण परिश्रमाने प्राप्त केलेल्या या यशाने शहराचे नावलौकीक वाढविले आहे. आपण संपादन केलेल्या यशाबद्दल सभागृह आपले मनःपूर्वक अभिनंदन व्यक्त करीत आहे तसेच आपल्या भविष्यातील पुढील शैक्षणिक वाटचालीकरीता सुयश चिंतीत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मा. पिठासीन अधिका-याच्या परवानगीने बोलतो, मागच्या १६/१०/२०१७ मागच्या मिटींगला विरोधी पक्षनेता म्हणून आपण लेटर दिल होते त्याचे नाव घोषित करण्याबाबत.

**धूवकिशोर पाटील::-**

सन २००२ पासून हे विरोधी पक्ष नेत्याचे जे पद आहे ते नेहमी वादात राहिलेले होते. सन २००२ साली मा. रोहिदास पाटील साहेबांना आपण विरोधी पक्षनेता पद डिक्लेर केले आणि पुन्हा आपले जे परशुराम पाटील होते त्यांना पुन्हा डिक्लेर केले आणि ह्या दोघांचा वाद हाय कोर्टापर्यत पाहोचला आणि जवळ जवळ पाच वर्ष होऊन गेली शेवटी निकाल लागला नाही. पुन्हा मागच्या टर्म मध्ये सुध्दा विरोधी पक्षनेता प्रमोद सामंत यांना डिक्लेयर केले. पुन्हा ते बदलण्यात आले लियाकत शेंख ह्याना म्हणजे हा जो वाद आहे हा नेहमी राहतो आणि म्हणून मी महापौराना विनंती केली होती की मॅडम ह्याची शहानिशा करा आणि विरोधी पक्षनेता पद कोणाला दिले पाहिजे सभागृहपद कोणाला दिल गेले पाहिजे जे लॉ मध्ये आहे त्याचा निट अभ्यास करा. आणि तसेच शासनाचे पण मत मागा नाहीतर परत हा पुन्हा वाद शासनाकडे जाईल. पुन्हा प्रलंबीत राहील. म्हणून माझी महापौराना विनंती राहील......................

**दिनेश नलावडे :-**

धृवकिशोरजी तुम्हाला सभागृह चालवायचे पण आहे....................

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

२०१२ ला तुम्ही सभागृहात होता तेव्हा विराधी पक्षनेता दुसरी गो्ष्ट आमच्या पक्षाला................

**ध्रृवकिशोर पाटील :-**

हा वाद १० वर्षापासून सभागृहामध्ये आहे त्याच्यावर माझी विनंती आहे हे वाद दूर करण्यासाठी आपण कृपया शासनाची मंजूरी मागवावी.

**अनिल सावंत :-**

निलम ताई काय अभ्यास आहे ध्रृवकिशोर पाटील यांचा..............

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

प्रांतिक अधिनियमाची पुस्तके आणली आहेत तुमच्या दालनामध्ये पडलेली आहे ती त्यांना द्या. त्याच्यामध्ये स्पष्ट काय उल्लेख आहे सचिव साहेब वाचून दाखवा.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब प्रश्न असा आहे गेल्या मिटींगपासून मी बघत आहे महापौरांना काही विचारल तर धृवकिशोर उभे राहतात. सचिवांना काही विचारल तर धृवकिशोर उभे राहतात. ह्या सभागृहामध्ये धृवकिशोर पाटलांनी महापौर पदाचा अपमान केलेला आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

मी बोललेल वक्तव्य पुन्हा रेकॉर्डींग ऐकून दाखवा. मी अजिबात अपमान केलेला नाही मी माझे जे पत्र दिलेले आहे जे माझे सांगणे आहे त्यावर वक्तव्य केलेले आहे मी अजिबात अपमान केलेला नाही.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्यांनी बसून जा मी उत्तर देत आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौराना त्यांनी पत्र दिले की तुम्ही अभ्यास करा म्हणजे याचा अर्थ महापौराचा अभ्यास काहीच नाही आणि हे अक्कल देणार महापौराना आणि सभागृहाला महाराष्ट्र प्रांतिक अधिनियमामध्ये स्पष्ट उल्लेख आहे. अभ्यास करा तुम्ही सांगायची गरज नाही. महापौर संक्षम आहेत.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहाला विनंती आहे इथून ४-५ सदस्य एकदाच उठतात त्याऐवजी प्रत्येकाने एक एकाने उठा सगळ्यांनी संधी मिळेल प्रश्न असा आहे की मी ह्या सभागृहाचा विरोधी पक्षनेता राहिलेलो आहे आणि विरोधी पक्षनेता बद्दल सातत्याने ह्या सभागृहात वाद आहे. सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब ह्यांनी ह्या विषयात आमच्याकडे एक दाद मागीतली आणि ह्या सदर्भात त्यांचे पत्र जे होत ते पत्र तुम्हाला वाचून दाखवतो त्याचे गांर्भिय लक्षात घ्या. वरील विषयानुसार कळविण्यात येते फक्त विरोधी पक्षनेते पदासाठी नाही, मा. सभागृह नेता व मा. विरोधी पक्षनेता निवडीबाबत वरील विषयानुसार कळविण्यात येते की वरिष्ठ नगरसेवक रोहिदास पाटील यांची आपण सभागृह नेते पदी नियूक्ती केलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९ (१) अ अन्वये जो निर्वाचित पालिका सदस्य मोठ्या संख्याबळ असलेल्या पक्षाचा नेता असेल महापौराकडून ज्याला तशी मान्यता मिळाली असेल तो सभागृहाचा नेता असतो आणि भारतीय जनता पार्टीतर्फे ऑगस्ट २०१७ महानगरपालिका निवडणूकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचीत सदस्यांनी श्री. हसमूख गेहलोत याचा गट नेतेपदी निवड केलेली आहे. यावरून वरिष्ठ नगरसेवक श्री. रोहिदास पाटील यांची आपण सभागृह नेतेपदी नियूक्ती चूकीची केली आहे असे वाटते त्यांनी त्यांचे मत दिलेले आहे त्यासोबत शिवसेना पक्षातर्फे विरोधी पक्षनेते पदी नगरसेवक राजु भोईर यांची नियुक्ती करण्याकरिता आपणास पत्र दिल्याचे समजते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९ (१) अ अन्वये जो निर्वाचित पालिका सदस्य मोठे संख्याबळ असलेल्या विरोधी पक्षाचा त्यावेळी नेता असेल. आणि महापौराकडून त्याला तशी मान्यता मिळाली असेल तर तो विरोधी पक्षनेता असेल असे कायद्यात नमुद आहे. तुमच्या माहितीसाठी सांगतो ज्यावेळी इथे उपमहापौर हा कॉग्रेसचा असताना विरोधी पक्षनेते पदी पण कॉग्रेसचाच माझी नियुक्ती करण्यात आली होती त्यावेळेला म्हणजे आपल्याकडे हे निश्चित ह्या गोष्टीमध्ये खुलासा होणे आवश्यक आहे. शासन दरबारी आपण शासनाचे मत ह्याच्यात मागितलेले आहे. निश्चित पणे येणा-या ७ दिवसात, ८ दिवसात आपल्याला हे उत्तर अपेक्षीत आहे. जुबेर इनामदार एक ऐकून घ्या विरोधी पक्षनेते पदाची घोषणा ही सभागृहातच झाली पाहिजे. असा कायदा नाही. हे मत आमच्याकडे उद्या आले तर उद्या महापौर दालनामधून ती घोषणा करण्यात येईल त्याच्यामूळे आपण ह्या विषयात फार काही झंझट न करता आपण अभ्यासू पध्दतीने दिलेले आहे. नुसता विरोधी पक्षनेता पदासाठी नाही आमचे सन्मा. सदस्य ज्यांचा नुकताच आपण अभिनंदनाचा ठराव मांडला त्यांच्या विषयात देखील आपण शासनाने मत मागितलेले आहे. कारण आम्ही गटनेते पदी हसमूख गेहलोत ह्यांना नेमलेले आजहे. आपण हसमूख गेहलोत ह्यांना नेमलेले आहे. आपण हरिश्चंद्र आमगावकर साहेबांना नेमलेले आहे आणि हा वाद जेव्हा बर्नट डिमेलो हे ह्या सभागृहाचे सदस्य असताना गटनेते पदी होते आणि त्यावेळेला लियाकत शेख ह्यांना कोर्टातून ऑर्डर घेऊन नेतेपदी बसविलेले होते म्हणून ह्या विषयामध्ये येणा-या ४ ते ८ दिवसात आपल्याला खुलासा होईल त्याच्यामुळे ह्याच्यामध्ये प्रतिष्ठा न करता ह्या विषयामध्ये आपण शांतपणे त्या शासनाच्या निर्णयाची वाट पाहू या.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापैार साहेब आताच आपण सांगितले की याचा खुलासा आपण शासनाकडे पाठवणार आहे गेल्या विशेष सभेत आपल्याला दिलेल होत मग ते ७ दिवसात येईल हे कशावरून शासनाकडून उत्तर तुम्ही बोलले एका दिवसात किंवा सात दिवसात येईल तुम्ही पाठ पुरावा एवढे दिवस झाले त्याचे उत्तर अजूनपर्यत आलेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

ह्या सभागृहाचा अंत्यत महत्वाचा दोन पदांचा निर्णय आहे. सभागृह नेतेपदाचे आहे. विरोधी पक्षनेते पदाचा आहे. आम्ही गांर्भियाने हा विषय घेतलेला आहे. लगेच मागू.

**दिनेश नलावडे :-**

तेवढेच महत्वाचे विरोधी पक्षनेता देखील आहेत. कारण त्या पदाची शान आहे जो पर्यत ह्या सभागृहामध्ये विरोधी पक्षनेता डिक्लेयर होत नाही तोपर्यत ही सभा चालणे भरपूर कठीण आहे. अयोग्य आहे. ह्या शहराचा अपमान होत आहे हे आपल्याला वाटत नाही का? ह्याचा विचार करा. आणि तुम्हाला ७ दिवसात उत्तर येणार हे तुम्हाला अपेक्षित आहे हे तुम्ही अगोदर मागून निकाल करायला पाहिजे होता.

**मा. उपमहापौर :-**

ही मागणी शासनाकडे केलेली आहे . आणि आधीच मागणी केलेली आहे आम्ही स्वतः ह्या गोष्टीला फॉलोअप करत आहोत. आणि लवकरात लवकर ह्या निर्णयाची अपेक्षा आहे. आणि विरोधी पक्षनेता पुन्हा एकदा सांगतोय की ह्या सभागृहातच डिक्लेयर केले पाहिजे. अशातला भाग नाही. ते महापौर आपल्या स्वतःच्या अधिकारात त्याच्या दालनात देखील डिक्लेयर करतील उद्या जर तो प्रस्ताव येणार असेल तर उद्याच्या उद्या करू. आपण मागितलेले आहे आणि लेखी खुलासा मागितलेला आहे शासनाकडून मत मागितलेले आहे.

**निलम ढवण :-**

साहेब एक संभ्रम आहे आपण जे स्पष्टीकरण दिलेले आहे जेव्हा पक्षाचा गटनेता नेमला जातो तो गटनेता पण पक्षाच्या वतीने नेमला जातो तो त्यांच्या संमतीने नेमला जातो त्याला सगळयांची मान्यता असते विरोधी पक्षनेत्यांची जेव्हा नेमणूक करायची असते त्यावेळी आपण जसे सांगितले की ज्यांची मेजोरेटी जास्त आहे त्यांचा विरोधीपक्षनेता किंवा जे सत्तेत आहेत त्यांचा सभागृह नेता तेही माझ्या माहितीप्रमाणे पक्षाचे किंवा ज्यांचा गट जास्त आहे. त्यांचा एकमताने ते नाव दिले जाते. यापुर्वी जे काही वाद झाले त्याच्यामध्ये वेगळी कारणे होती. परंतू ह्यावेळी जो गट स्थापन झालेला आहे त्या गटामध्ये किंवा आम्ही इथे एकत्र आहोत सेना त्यामध्ये मोठा गट असल्यामुळे जे नाव दिलेले आहे ते कूठलाही वादग्रस्त नाही आहे आणि त्यानुसार पक्षाने ते दिलेले आहे. फक्त महापौराना ते अनाउंस करायचे आहे. त्याच्यामुळे मागचा संदर्भ इथे लावायची आवश्यकता वाटत नाही.

**मा. उपमहापौर :-**

आपल्याला सांगतो की, ज्यावेळेला मी उपमहापौर पदी ह्या सभागृहात कामकाज करत असताना ह्या सभागृहाचे सन्मा. नेते आपल्या सभागृहातील सन्मा. सदस्य धनेश पाटील त्यांचे वडील स्वर्गिय परशुराम पाटील साहेब हे कॉग्रेस पक्षाचेच होते मी कॉग्रेस पक्षाचा उपमहापौर मी सत्तेमध्ये मायरा मेन्डोन्सा मॅडम ह्या महापौर आणि विरोधी पक्षनेता कॉग्रेसचाच होता.

**निलम ढवण :-**

तोच तर साहेब फरक आहे.

**मा. उपमहापौर :-**

मागच्या सभागृहात राष्ट्रवादी हा मोठ्या संख्येने मोठा पक्ष होता पण सभागृहाचे कामकाज १९ सदस्य असलेल्या कॉग्रेस पक्षाचा विरोधी पक्षनेता काम करत होता हा सक्षम आहे. हा संभ्रम सरसकट याचा पूढच्या काळात हा प्रश्न कधीच उपस्थित होऊ नये म्हणून आपण शासनाचे मत मागितलेले आहे.

**निलम ढवण :-**

ठिक आहे शासनाचे मत पण ह्यामध्ये तुमचा काही संभ्रम नाही आहे त्यावेळील तुम्ही सत्तेत असणारच परत विरोधात पण मागत होतात म्हणजे ते तुम्ही यांच्याशी कम्पेयर करूच शकत नाहीत आजच्या परिस्थितीला ते अनुकूल नाही.

**मा. उपमहापौर :-**

हे कायद्यात प्रोव्हिजन आहे.

**निलम ढवण :-**

आजची परिस्थिती काय आहे तुम्ही मागचा संदर्भ जर लावत असतील तर आजची परिस्थिती काय आहे. नाही पण कायद्यात प्रोव्हिजन काय आहे. मुद्दाम चालढकल करायची असेल तरी करा काय हरकत नाही. ८ दिवस असू देत एक महिना असू दे आम्हाला काही फरक पडत नाही तुम्ही क्लेरिफिकेशन जे देणार ते आताच्या वास्तव्याला धरून द्यावे ही आमची तुमच्याकडे विनंती आहे.

**मा.उपमहापौर :-**

ह्याच्यामध्ये कूठच्याही प्रकारची दिरंगाई करण्याचा हेतू नाही. अत्यंत शुध्द हेतूने कारण आतापर्यत हा घोळ सतत राहिलेला आहे. आणि ध्रुवकिशोर पाटील यांचे खरच मी कौतूक करेन ते एक अभ्यासू नगरसेवक आहेत.

**निलम ढवण :-**

साहेब एवढ्या वर्षापासून घडत आले त्यावेळेपासून ध्रुवकिशोर साहेब सन्मा. सदस्य ह्या सभागृहाचे आहेत इतक्या वर्षापासून आहेत किती वर्ष झाले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

२० वर्ष झाली.

**निलम ढवण :-**

२० वर्षापासून आहेत २० वर्षात त्यांना कधी अस वाटल नाही की हे चूकीचे चालले आहे. सभागृहाचे कामकाज ते शासनाकडे पाठवू या. आजच त्यांना जाग आली. त्या बाजूने बसल्यानंतर...............

**प्रविण पाटील :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी साहेब आपल्या परवानगीने बोलतो, मघाशी आपण बोललात ध्रुवकिशोर पाटलांना जे पत्र दिलेले आहे त्याच्यामध्ये दोघांचा उल्लेख केला होता. ते नियमाला पकडून आहे . बरोबर त्याच्यामध्ये सभागृहनेता जर तुम्ही विरोधी पक्षा नंत्याची जर नेमणूक करत नसाल तर सभागृह नेत्याची कुठल्या कायद्याद्वारे तुम्ही नेमणूक करत आहेत.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही जेव्हा ही सभागृहातून नेमणूक करण्यात आली.

**प्रविण पाटील :-**

नियम तर दोघानाच आहेत.

**मा. उपमहापौरः-**

नेमणूक करण्यात आली म्हणून त्याविषयी दोघांची मते मागितली आहेत.

**प्रविण पाटील :-**

मग सभागृहनेत्याला डिक्लेयर करा नाही तरी हे तरी जाहिर करा दोन्ही तुम्ही एकाच नियमाने बघतात. तुमच्या पक्षाचे तुम्ही जाहिर केले.

**मा. उपमहापौर :-**

८ दिवसात त्याचाही निर्णय येईल.

**प्रविण पाटील :-**

८ दिवसानी करा आम्ही तयार आहोत.

**हरिश्चंद्र आमगावकरः-**

आताची ती केबीन खाली करा आणि सभागृहनेता पद रद्द करा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब आता आपण सांगितले त्यावेळेस तुम्ही उपमहापौर होते माझी शंका मी जरा उपस्थित करतो. उपमहापौर साहेब त्यावेळेस राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी हा मोठा पक्ष होता. आणि त्याच्याबरोबर ह्या ठिकाणी महापौर बसला पाहिजे म्हणून कॉंग्रेसने युती केलेली. पण दोन नंबरचा पक्ष कॉंग्रेस पक्ष होता. त्यामुळे तुम्ही उपमहापौर झाले आणि परशुराम पाटील हे विरोधी पक्षनेते पदी आले. ती अवस्था आज नाही आहे. आज बी.जे.पी. एकच पार्टी आहे आणि दुसरी शिवसेना दोन नंबरला पक्ष येतो. त्याच्यामुळे तो कायदा ह्या सभागृहात लागु होत नाही. परंतु हे ध्रुवकिशोर पाटील कसे विसरले. त्यांना ते आठवले नाही का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्या महाराष्ट्रामध्ये भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना पक्षाचे मुख्यमंत्री आहे हे विसरले. मुख्यमंत्री हे शिवसेना व भाजपाचे आहेत. हे विरोधीमध्ये नाहीत.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

ह्या सभागृहाला शिक्षीत देणे इतपत सोपे नाही आहे. त्यांनी सभागृहामध्ये अभ्यास करुन यावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पिठासीन अधिकारी साहेब हे स्वतःला विरोधी पक्षनेता समजतात परंतु हे विरोधीमध्ये नाही आहेत.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्यांना विनंती आहे की सर्वांनी खाली बसा. ज्यांना बोलायचे आहे त्यांनीच उभे रहा बाकी लोकांनी खाली बसा.

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब मला वाटते ह्याच्यावर खुप चर्चा झालेली आहे. सभेची कारवाई आता पुढे सुरु करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पाटील साहेबांची नियुक्ती ती महापौर दालनामध्ये झालेली होती कुठच्याही सभागृहामध्ये झाली नव्हती आणि मागची जी मिटींग होती ही विशेष महासभा होती आणि म्हणून.................

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

विरोधी पक्षनेत्याचा विषय आमचा चर्चा ते करत आहेत. चर्चा आम्ही केली पाहिजे आम्ही तुमच्याकडे मागणी करतोय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही उत्तर दिल पाहिजे ना.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

आमगावकर साहेब मी उत्तर देतो.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मागणी तुमच्याकडे केली मग त्यांनी उत्तर द्यायचे का? तस जर असेल तर महापौरांनी खाली बसावे.

**निलम ढवण :-**

पिठासीन अधिकारी साहेब आता जे सन्मा. ध्रुवकिशोरजींनी उत्तर दिलेले आहे की स्टेटमध्ये आमची युती आहे. त्यामुळे विरोधी नाही आहेत. स्टेटचा किंवा त्या लेव्हलचे शेवटी हे सभागृहच वेगळ आहे. मग ह्या सभागृहात अशी योजना का केली आहे. का तिकडे विरोधात बसले आहेत. तुम्ही जर तिकडे कम्पेअर करत असाल तर त्यानुसार इथे व्यवहार चालु देत युतीच्या हिशोबाने.

**मा. उपमहापौर :-**

ताई तुम्ही बसा. एका घरातल भांडण आहे. तो विषय संपला. मी काय सांगतो की हे पत्र महाराष्ट्र सरकारकडे पाठविलेले आहे. युडीला पाठविलेले आहे आणि त्याचा अहवाल निश्चितपणे ८ दिवसात आपल्याकडे येईल. आणि विरोधी पक्षनेता पद डिक्लेअर केले जाईल. आता ह्या विषयावरती चर्चा आपण थांबवावी आणि पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**जुबेर इनामदार :-**

आपण दिलेले उत्तर किंवा पाठविलेले पत्र हा हेतुपरस्पर आहे. जेणेकरुन विरोधी पक्षनेता पद डिक्लेर झाले नाही पाहिजे. आपल्याला कुठेही पाठवायची गरज नव्हती. प्रशासन सक्षम नाही का? सचिव तुम्हाला अधिनियम वाचता येत नाही का? ४९३ अधिनियम महापालिकेच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याच्यामध्ये पोटकलम आहेत. सुधारणा करायची असली तर शासन दरबारी केले जातात. त्याच्यामध्ये कुठल अंतर्भुत करायच असेल सभागृहनेत्यांची तर त्याच्यामध्ये केले जातात. विरोधी पक्षासाठी स्पष्ट भुमीका अटी नियमांनी घेतलेली आहे. याच्यासाठी सरकार दरबारी जायची गरज नव्हती. हे हेतु परस्पर करण्यात आलेले आहेत. जेणेकरुन विरोधी पक्षनेत्याचे पद स्विकृत झाले नाही पाहिजे. हा आमचा स्पष्ट आरोप आहे.

**मा. उपमहापौर :-**

आरोप करणे हे आपले काम आहे. परंतु असा आमचा कुठचाही हेतुपुरस्कृत हेतु नाही. ह्याबाबत आम्हाला..................

**जयंतीलाल पाटील :-**

मागच्या टाईमाला पण विरोधी पक्ष नेत्याचे पदाला प्रॉब्लेम झाला होता.

**मा. उपमहापौर :-**

अहो एवढे मोठे पद सत्ताधाऱ्यांना मिळत आहे. सत्ताधारी कधी विरोधात असतात का?

**जुबेर इनामदार :-**

सत्ताधारीच विरोधक आहेत.

**मा. उपमहापौर :-**

नाही आम्ही बघा मी उपमहापौर होतो आणि आमच्याच पक्षाचा विरोधी पक्षनेता होता हि विडंबना आहे.

**निलम ढवण :-**

ती परिस्थिती आता नाही साहेब.

**दिनेश नलावडे :-**

त्या टाईमाला दोन नंबरचा पक्ष कॉंग्रेस होता आणि सत्ताधारी बहुमतामध्ये राष्ट्रवादी होती. कोर्टात देखील विरोधी पक्ष म्हणून कॉंग्रेसला मिळाले होते. ती परिस्थिती आता नाही.

**मा. उपमहापौर :-**

कृपया गैरसमज नसावा. ही बाब अत्यंत स्वयंस्पष्ट आहे. कुठल्याही प्रकारचा गैरसमज करु नका. आम्ही हे पाठविणार आहोत निर्णय घेणार अस सांगत नाही. ऑलरेडी प्रस्ताव शासन दरबारी पाठविलेला आहे. (सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

होल्डवर ठेवा.

**जुबेर इनामदार :-**

प्रमोद सामंत ह्याच सभागृहामध्ये प्रमोद सामंतला कॉंग्रेस पक्षाच्या सदस्याला विरोधी पक्षनेता घोषित करण्यात आले होते. आम्ही अल्प असताना सुध्दा त्या काळामध्ये राष्ट्रवादीच्या विरोधी पक्षनेता व्हायला पाहिजे होता. तरीही घोषणा कॉंग्रेस पक्षाच्या सदस्याची करण्यांत आली होती. तर ती चुक शासनाने सोडवून पाठवलेली होती. त्याचा अर्थ आपल्याकडे इतिहास घडलेला आहे.

**प्रशांत दळवी :-**

उपमहापौर साहेब आपल्या परवानगीने बोलतो ह्या वेळेला सन्मा. सदस्य आपल्याला एवढे ज्ञान देत आहेत तर मला ते सांगायचे आहे की विरोधी पक्षाची एवढी केवीलवाणी अवस्था का झाली आहे. विरोधी पक्ष सभागृहाला काळीज फासतात. त्यावेळेला राष्ट्रवादीही एक नंबर वरती होती. कॉंग्रेस दोन नंबर वरती होती असे असताना कॉंग्रेसचे ह्याच सन्मा. गटनेत्यांनी महापौरांना पत्र दिले की त्यांची नेमणुक करा म्हणता ना..............

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

विरोधी पक्षनेता पद हे केंद्रापासुन राज्यापासुन सर्व ठिकाणी आहे. हा काही लोकसभेचा भाग आहे मग तुम्ही कशाला घाबरता. विरोधी पक्षनेत्यासाठी आहेत तुमच्याकडे महापौर आहेत, उपमहापौर आहेत, सभापती आहेत, विरोधी पक्षनेता राहू द्या लोकशाहीचे काम लोकशाही पध्दतीने होऊ द्या. घाबरु नका विरोधी पक्षनेत्याला.

**जुबेर इनामदार :-**

विरोधी पक्षनेत्याची घोषणा झालीच पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

मी केलेला विरोध हा वैधानिक विरोध होता. मी चुकीचा विरोध कधी केला नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही अन्यायाच्या विरोधात विरोध केला.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. विरोधी पक्षनेत्यांच्या सर्व सदस्यांना विनंती आहे उद्या, पर्वा आपल्यापैकी आपले दोन गटनेते आमचा गटनेता आपण शासन दरबारी जाऊन या विषयात.............

**निलम ढवण :-**

काही गरज नाही.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

एवढ्या मोठ्या अधिनियमामध्ये स्पष्ट उल्लेख असताना...............

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमच्या खुलाशाने विरोधी पक्षाचे सदस्य सॅटीस्फाईड झाले नाही तर माझी तुम्हाला अशी विनंती आहे ही सभा सुरु करावी.

**जयंतीलाल पाटील :-**

विरोधी पक्षनेता हा विषय महत्वाचा आहे.

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला विरोधी पक्षनेते पद पाहिजे की सभा सुरु करायची नाही?

**निलम ढवण :-**

आम्हाला दोन्ही पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहाचा सन्मान राखा आपल्याला विनंती करण्यात येते. ह्या संदर्भात आपण मत मागितलेले आहे. पुढच्या महासभेची वाट बघण्याची गरज नाही आपल्याला. हे पद महापौर दालनातून घोषित करण्यांत येईल. आता कृपया आपल्याला विनंती आहे सभागृहाचे कामकाज सुरु होऊ द्यावे.

**प्रविण पाटील :-**

विरोधी पक्षेनत्याला कशाला घाबरतात बिनधास्त द्या.

**मा. उपमहापौर :-**

घाबरण्याचा प्रश्न नाही हे वैधानिक पद आहे ते असाव ही आमची ही भावना आहे. याच्या आधीच २-२ वर्ष विरोधी पक्षनेता नव्हता इथे.

**प्रविण पाटील :-**

होता प्रत्येक वेळेला होता.

**मा. उपमहापौर :-**

सचिव सभागृहाचे कामकाज सुरु करावे.

(सभागृहात गोंधळ)

**राजु भोईर :-**

विरोधी पक्षनेता घोषित करा.

**जुबेर इनामदार :-**

विरोधी पक्षनेता झालाच पाहिजे.

**प्र. नगरसचिव :-**

लक्षवेधी आलेली आहे. ती मी पिठासीन अधिका-यांकडे सादर करतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला खुलासा पटला नसेल तर माझा इलाज नाही.

**दिप्ती भट्ट :-**

दोन्ही पदे रद्द करा नाहीतर दोन्ही पदे द्या.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहाचे कामकाज चालु नये ह्या भावनेतून आपण हा गोंधळ जर घातला असेल तर हा सभागृहाचा अपमान आहे. हे चालणार नाही आम्ही शासनाकडून आल्याशिवाय डिक्लेर करणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब लक्षवेधी दिलेली आहे..............

**मा. उपमहापौर :-**

ह्या सभागृहासमोर लक्षवेधी आलेली आहे. शिवार तलाव व वर्धमान फेन्टासीबाबत. सन्मा. नगरसेविका श्रीम. निला सोन्स यांची लक्षवेधी आहे.

**जुबेर इनामदार :-**

विरोधी पक्षनेता पद घोषित झालेच पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. नगरसेवक बसून जा.

**रोहिदास पाटील :-**

जुबेर आता महापौर आल्यात आपण बसा.

**मा. महापौर :-**

तुम्ही तुमच्या जागेवर बसून जा.

**जुबेर इनामदार :-**

महापौर पिठासीन झाल्यामुळे आमची बाजू आम्हाला मांडायची संधी देण्यात यावी. महापौर मॅडम आपण महापौर आहात. सभागृह चालवायचा अधिकार तुमचा आहे. सभागृहामध्ये आपण फक्त एका पक्षाचे महापौर नव्हे.

**मा. महापौर :-**

मला अधिकार आहेत मला काय करायचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौरांनी अधिनियमाचे परिपूर्ण पालन करावे हे त्यांचे परमधर्म आहे.

**मा. महापौर :-**

श्रीम. निला सोन्स आपकी लक्षवेधी है।

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

विरोधी पक्षनेते पद घोषित झालेच पाहिजे.

**मा. महापौर :-**

दोन दिवसानंतर ते येणार.

**मर्लिन डिसा :-**

नियमाप्रमाणे तुम्ही विरोधी पक्षनेता पद आम्हाला नेमून द्या.

**मा. महापौर :-**

माझ्याकडे दोन दिवसानंतर येणार.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, मगाशी ह्या विषयावर सगळी चर्चा झालेली आहे. परंतु आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, पहिल म्हणजे सन्मा. ध्रुवकिशोरजी पाटील यांनी लेटर दिल्यानंतर आपण शासनाकडे पाठविलेले आहे असे उत्तर सन्मा. पिठासीन अधिकारी यांनी दिलेले आहे. जर खरोखरच सभागृह नेता आणि विरोधी पक्षनेता ह्या संदर्भात जर आपल्याला काही समस्या होत्या तर माझ्या माहितीप्रमाणे यापूर्वीचा जो प्रकार होता विरोधीपक्षनेता आणि बाकीच्या काही गोष्टी त्यामध्ये खुप विरोधाभास आहे. आणि आता वास्तव्यात ती परिस्थिती नाही आहे. मग मागच्या विषयांवर विचार घेण्यासाठी आता शासनाकडे पाठविण्याचा तोही ध्रुवकिशोरजींनी तुम्हाला लेटर दिल्यानंतर तो निर्णय तुम्ही घेण्याचा हा जो विचार आहे हा फार चुकीचा आहे. कारण हे जाणूनबूजून हेतुपुरस्कृत हे सगळ करण्याचा काम ह्यामधून दिसून येते. दुसरी गोष्ट ह्यामध्ये दोघांचाही उल्लेख केलेला आहे. सभागृहनेता आणि विरोधीपक्षनेता ह्या दोघांचे मेन्शन केलेले आहे. त्या लेटरमध्ये तर जो न्याय तुम्ही विरोधी पक्षनेत्यासाठी देत आहेत तोच न्याय तुम्ही सभागृह नेत्यासाठी दिला पाहिजे. आणि जर तुम्ही दिला असेल तर तुम्ही त्याचे धोरण शासनाला विचारत असाल तर याचा अर्थ सभागृहनेते पण तुम्ही चुकीच्या पध्दतीने नेमलेले आहेत. मग तोवर त्याला पण स्थगिती द्या. त्याचीही माहिती द्या. त्यानंतर तुम्ही त्यांना डिक्लेअर करा. तुम्ही एका बाजुने योग्य मांडत आहेत. एका बाजूने विरोधी पक्षनेत्यांना निवडताना तुम्ही कायदा दाखविता. आणि आजपर्यंत हे सुचले नाही २०-२५ वर्षात किंवा त्याच्या अगोदरपासून जे प्रकार घडत होते त्यानंतर मला वाटत सन्मा. सामंत त्यावेळी पण जेव्हा विरोधी पक्षाने वाद झाला त्यावेळी शासनाने एखादा निर्णय दिलेला आहे. मग आता परत ह्या गोष्टी लियाकत शेख झाले तेव्हा मग त्यानंतर पण आता तुम्ही ह्या गोष्टी द्यायची गरज काय. ह्या पक्षांनी एकमताने सगळ दिलेले आहे. इथे ना कोणाचे वाद आहेत ना आमच्या बरोबर बसलेले कॉंग्रेसचा वाद आहे. ह्या गोष्टीशी तर मग आता तुम्ही विरोधी

पक्षनेत्याचे शासनाकडे पाठवायची गरज काय? हे सर्व जाणून बूजून चालल आहे साहेब ते पण सांगायची गरज लागली ध्रुवकिशोरजींना २० वर्ष नगरसेवक असलेले त्यांना गोष्ट सांगायला लागली. आता महापौर मॅडम हा तुमचा निर्णय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम ही वस्तुस्थिती आहे सन २००२ साली ही महापालिका झाली आणि सन २००२ पासून हा विरोधी पक्षनेता वाद सुरु आहे. आता यांना कळले पाहिजे आपले सदस्य रोहिदास पाटील साहेबांना आपण डिक्लेअर केलेले आहे. आणि एखाद्याचे पद आपण डिक्लेअर केल्यानंतर परत काढावे.

**जयंतीलाल पाटील :-**

स्थगिती देता येते ना. महापौर मॅडमला परवानगी आहे स्थगिती देण्याची.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, कोणत्या कलमाखाली सभागृह नेता पद डिक्लेअर झाले? सचिव महोदय आम्हाला जरा माहिती द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन २००२ सालापासून हा विरोधी पक्षनेताचा वाद सुरु आहे. सन २००२ साली रोहिदास पाटील साहेब हायकोर्टात गेले होते.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, सभागृह चालू झाल तेव्हा आमची अशी इच्छा होती की महापौर आल्यानंतर सभागृह चालू करा तुम्ही इमारतीमध्ये होता एखादा नगरसेवक पत्र देतो ते तुम्ही युडीला पाठवता. उद्या मी पत्र देतो ध्रुवकिशोर पाटील अनैतीक मार्गाने निवडून आलेले आहेत. त्यांचे नगरसेवक पद रद्द करा. युडीला पाठवणार महापौर सक्षम आहेत. प्रांतीक अधिनियमामध्ये तशी तरतूद आहे. मग का डिक्लेअर करत नाही. उपमहापौर पिठासीन धिकारी होते त्यांनी सांगितल माझा हेतु शुध्द आहे. आम्हाला माहिती आहे. उपमहापौरांचा हेतु एकदम शुध्द आहे. पण आणखी कोणाचा हेतु ह्यामागे दडलेला आहे. त्यांनी ह्यांना पुढे केलेले आहे. नगरसेवकांना पत्र द्या त्यांनी पत्र दिले ते तुम्ही युडीला पाठवणार. युडी ५ वर्ष निर्णय करणार नाही मी सांगतो. विरोधी पक्षनेता डिक्लेअर झालाच पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो येणाऱ्या हफ्त्यामध्ये जर हा निर्णय निश्चित होणार असेल हे अधिकृत पत्र पाठविलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

त्यांच्या पत्राची भाषा आहे पत्र तुम्ही परत वाचून दाखवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही महापौरांचा अपमान करत आहेत.

**मा. उपमहापौर :-**

मी पत्र वाचून दाखवू का?

**अनिल सावंत :-**

हो वाचून दाखवा.

**मा. उपमहापौर :-**

आपण जागेवर बसा सभागृहामध्ये ह्या विषयावरती फार पेशाने चर्चा झाली पत्र मी आधीही वाचून दाखवल आणि सभागृहातली जी वैधानिक पदे आहेत जी निवडून घ्यायची आहेत ती आपण निवडणूकीच्या मार्गातून निवडून देत असतो. सभागृह नेता, विरोधी पक्षनेता पद हे महापौरांचे अधिकार आहेत. आणि ते स्वतःच्या अधिकारात ते डिक्लेअर करत असतात. परंतु त्याला एक पार्श्वभूमी आहे. आपल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमची पार्श्वभूमी आहे. आणि त्याच्यामध्ये स्पेसीफिक मेन्शन केलेले आहे आणि मी हे पत्र आधी वाचून दाखवलं. पुन्हा एकदा पत्र वाचून दाखवतो. हे महापौरांना आधी पत्र दिलं आणि महापौरांकडून हे युडीकडे आपण पत्र पाठविलेले आहे. विषय मा. सभागृह नेता व मा. विरोधी पक्षनेता निवडीबाबत असा कुठे याच्यामध्ये चुकीचा हेतू नाही ते आपल ठेवाव झाकून आणि दुसऱ्याचे पहावे वाकुन.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

वरील विषयानुसार कळविण्यांत येते की, मा. वरीष्ठ नगरसेवक श्री. रोहिदास पाटील यांची आपण सभागृह नेते पदी नियुक्ती केलेली आहे. हा प्रश्न महापौरांनीच विचारायचा असतो म्हणून स्वाभाविक आहे त्यांना लिहिलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १९ (१) अ अन्वये, जो निर्वाचित पालिका सदस्य मोठे संख्याबळ असलेल्या पक्षाचा त्यावेळी नेता असेल आणि महापौरांकडून ज्याला तशी मान्यता मिळालेली असेल तो सभागृहाचा नेता असतो. हे अधिनियमात लिहिलेले आहे. हे ध्रुवकिशोरचे वाक्य नाही. हा १९(१) च्या अ च्या तरतुदीत पहा स्पेसिफिकली म्हटलेले आहे सभागृह नेता असेल. आहे की नाही ही सत्यता आहे. भारतीय जनता पार्टी तर्फे ऑगस्ट २०१७ महापालिका निवडणूकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचित

सदस्यांनी श्री. हसमुख गेहलोत यांची गटनेते पदी निवड केलेली आहे. मोठ्या संख्येने निवडून आलेला मोठ्या पक्षाचा नेता म्हणून त्यांची निवड केलेली आहे. यावरुन मा. वरिष्ठ नगरसेवक श्री. रोहिदास पाटील यांची आपण सभागृह नेते पदी नियुक्ती केलेली आहे. ती चुकीची आहे असे वाटते त्यांनी महापौरांना विचारलं की रोहिदास पाटिल यांची नियुक्ती चुकीची आहे. परत त्याबरोबर आपण पुढची चुक करता कामा नये. एक गोष्ट नक्की आहे विरोधी पक्षनेते पद आज डिक्लेअर केलं काय चार दिवसांनी केल काय. तुम्हाला त्याच्यात इंटरेस्ट नाही कामकाजात विलंब कसा करता येईल त्याच्यात इंटरेस्ट आहे.

(सभागृहात गोंधळ)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ज्या निवड झाल्यानंतर सभागृह नेता ज्या दिवसापासून निवड केली त्या दिवसापासून आजपर्यंत स्थगिती देऊन रद्द करा. तर आम्ही इथे थांबतो.

**मा. उपमहापौर :-**

अशा स्थगिती किंवा कुठल्या प्रलंबित नाही.

**अशरफ शेख :-**

तुम्ही स्वतः म्हणालात की चुक झाली तर ते रद्द करा.

**मा. उपमहापौर :-**

हे पत्र ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. मॅडम आपण सभागृहाचे कामकाज सुरु करावे.

**जुबेर इनामदार :-**

शासनाकडे जे पत्र पाठविलेले आहे ते सभागृहाला वाचून दाखवा.

**मा. उपमहापौर :-**

समजा वाचून दाखवल तर तुम्ही पुन्हा हाच गोंधळ घालणार असाल तर वाचणार नाही. वाचुन गप्प बसणार असाल तर वाचून दाखवतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

आपण लक्षवेधी नंतर घेऊ.

**निलम ढवण :-**

विरोधी पक्षनेता पद झालेच पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७, **दि. 29/09/2016, दि. 21/10/2016 व दि. 03/12/2016 रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. २९/०९/२०१६, दि. २१/१०/२०१६ व दि. ०३/१२/२०१६ रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

सचिव साहेब नियम सांगा.

**प्र. नगरसचिव :-**

नियम सांगितलेला आहे नियम वाचून दाखवलेला आहे. डिक्लेअर मी नाही करणार. डिक्लेअर करण्याचा अधिकार महापौरांचा आहे. महापौरांना ते पत्र हॅन्डओव्हर झालेले आहे.

**मा. उपमहापौर :-**

शांत राहा तुम्हाला विनंती केलेले आहे की ह्या विषयावर शासनाचे मत मागविलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी बसून जा. तुम्हाला उत्तर मिळालेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

आपको सब आन्सर दे दिया गया है आप बैठ जाईए।

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला सर्व उत्तर मिळाले तरी तुम्ही अस करतात.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पुढचा विषय घ्या. शासनाचा निर्णय येणार तेव्हा मी देणार.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम पहिला आधी अस झालेले आहे की ध्रुवजींनी लेटर दिल आणि त्या हिशोबाने तुम्ही वरुन वाचन करतात. जस काही शासनाकडून लेटर आलेले आहे.

**मा. महापौर :-**

शासनाचे आन्सर तुम्हाला दिलेले आहे देणार.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पुढचा विषय घ्या. सर्वांना विनंती आहे जागेवर बसून जा.

**प्र. नगरसचिव :-**

सर्व सदस्यांनी कृपया जागेवर बसायचे आहे.

**मा. महापौर :-**

शासनाकडून दोन दिवसात उत्तर येणार आहे तेव्हा डिक्लेअर करु.

**प्र. नगरसचिव :-**

महापौर मॅडम उभे आहेत आपण जागेवर बसा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

ते मी चेंज करु शकत नाही शासनाचा निर्णय येणार तेव्हा आपण डिक्लेअर करु.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

विरोधी पक्षनेता पद घोषित झालेच पाहिजे.

**प्रकरण क्र. १७ :-**

**दि. 29/09/2016, दि. 21/10/2016 व दि. 03/12/2016 रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. १४ :-**

दि. २९/०९/२०१६, दि. २१/१०/२०१६ व दि. ०३/१२/२०१६ रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मीय उत्सवाअंतर्गत सणांसाठी विविध ठिकाणी बोटी, तराफे, हायड्रोलिक क्रेन, फोर्क लिफ्ट व जीवनरक्षक इ. व्यवस्था कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय उत्सवांसाठी महानगरपालिके मार्फत विविध व्यवस्था करण्यात येते. शहरामध्ये गणपती, नवरात्री, दसरा, गणगौर उत्सव, माघी गणेश उत्सव, सरस्वती पूजा, साखर चतुर्थी, छटपूजा या उत्सवासाठी भाईंदर पूर्व व पश्चिम चौपाटी, शहरातील विविध तलाव खाडी किनारी मूर्तीच्या विसर्जनासाठी व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असते.

मुर्तीच्या विसर्जनासाठी बोटी, तराफे, हायड्रोलिक क्रेन, फोर्क लिफ्ट व जीवरक्षक यांची व्यवस्था दरवर्षी महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. विषयांकीत कामासाठी मे. कौशिक पाटील यांना कार्यादेश देण्यात आलेला असून त्याची मुदत दि.३१/०३/२०१७ रोजी संपलेली आहे. विषयांकीत कामासाठी निविन निविदा मागविणे आवश्यक आहे. सदर कामासाठी रु.७४.०० लक्ष इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. विषयांकीत कामासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या "सर्वधर्मिय उत्सव मंडप/लाईट व इतर व्यवस्था" या लेखाशिर्षकात तरतूद उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रशासनाचा प्रस्ताव पाहता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

**ठराव**

प्रशासनाच्या प्रस्तावानुसार विविध कामासाठी ५ वर्ष मुदतीसाठी निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकिय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर आहे. पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सिक्युरीटी बोलवा. सर्व सदस्यांनी बसून जा. सन्मा. सगळे सदस्यांनी बसुन जा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

सर्वांना विनंती आहे आपआपल्या जागेवर बसण्यात यावे.

**मा. महापौर :-**

नियमाप्रमाणे बसून जा.

**मा. उपमहापौर :-**

आपआपल्या जागेवर बसा.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

शासनाचा निर्णय येईल तेव्हा नंतर ठरवू. आपण नंतर तयारी करु नंतर करु मी संधी देत आहे एक हफ्त्याची. संधी दिलेली आहे. एक विक नंतर मी देणार आहे. नंतर बघु काय करायचे आहे ते आपण बसून जा. सर्व सन्मा. सदस्यांनी बसून जा. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८ चे वाचन केलेले आहे.

**मा. महापौर :-**

आपको आन्सर दे दिया गया है।

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

विरोधी पक्षनेते पद डिक्लेअर झालेच पाहिजे.

**मा. महापौर :-**

नंतर करणार. तुम्ही आता बसून घ्या. शासनाचा निर्णय येणार नंतर मी बोलेन. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १८ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मीय उत्सवाअंतर्गत सणांसाठी विविध ठिकाणी बोटी**, **तराफे**, **हायड्रोलिक क्रेन**, **फोर्क लिफ्ट व जीवनरक्षक इ**. **व्यवस्था कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत**.

**ठराव क्र. १५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय उत्सवांसाठी महानगरपालिके मार्फत विविध व्यवस्था करण्यात येते. शहरामध्ये गणपती, नवरात्री, दसरा, गणगौर उत्सव, माघी गणेश उत्सव, सरस्वती पूजा, साखर चतुर्थी, छटपूजा या उत्सवासाठी भाईंदर पूर्व व पश्चिम चौपाटी, शहरातील विविध तलाव खाडी किनारी मूर्तीच्या विसर्जनासाठी व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असते.

मुर्तीच्या विसर्जनासाठी बोटी, तराफे, हायड्रोलिक क्रेन, फोर्क लिफ्ट व जीवरक्षक यांची व्यवस्था दरवर्षी महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. विषयांकीत कामासाठी मे. कौशिक पाटील यांना कार्यादेश देण्यात आलेला असून त्याची मुदत दि.३१/०३/२०१७ रोजी संपलेली आहे. विषयांकीत कामासाठी निविन निविदा मागविणे आवश्यक आहे. सदर कामासाठी रु.७४.०० लक्ष इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. विषयांकीत कामासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या "सर्वधर्मिय उत्सव मंडप/लाईट व इतर व्यवस्था" या लेखाशिर्षकात तरतूद उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रशासनाचा प्रस्ताव पाहता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

<u>ठराव</u>

प्रशासनाच्या प्रस्तावानुसार विविध कामासाठी ५ वर्ष मुदतीसाठी निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकिय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १९, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मासळी व भाजी मार्केट भुई भाड्यात वाढ करणेस मान्यता देणेबाबत**.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी मार्केट इमारती असून सदर मार्केट मध्ये बसणाऱ्या मासळी विक्रेत्याकडून रु. ३००/- प्रति माह व मटन विक्रेत्याकडून रु. ६००/- प्रति माह भाडे आकारण्याबाबत मा. स्थायी समीती सभा दि. ३०/०६/२०१६ ठराव क्र. ४१ अन्वये निर्णय झाला होता. त्यानुसार सर्व संबंधिताना रक्कम भरण्याबाबत वेळोवेळी भाडे भरण्याबाबत बिले देण्यात आली होती. तथापी बऱ्याच विक्रेत्यांनी भाडे भरलेले नव्हते. तसेच मासळी विक्री संघाकडून महानगरपालिकेने ठरविलेले दर जास्त असल्याने सदर दिनांकापासून कमी करावे तसेच बाजाराच्या स्वच्छतेची, साफसफाईची हमी स्वतः घेवू असे कळविले होते. त्यानुसार सदर प्रस्तावावर महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र.७० अन्वये मासळी विक्रेत्याकडून कर आकारणी दिनांकापासून रु.२०/- प्रति माह बाजारशूल्क/भाडे आकारण्याबाबत निर्णय घेवून मागील सर्व बिले निर्लेखीत करण्यास देखील मान्यता देण्यात आली. सदर मार्केट इमारतीची साफसफाई संबंधित विक्रेत्यांनी करुन लाईट बिल, पाणी बिल सदर विक्रेत्यांनीच भरावयाची होती.

6) विक्रीचा माल फक्त देणेत आलेल्या गाळयामध्ये व ठेवणेचा असून अन्य मोकळी जागा त्यासाठी वापरणेची नाही.

7) सदर ओटयाची दुरुस्ती व निगा हे मंजुर ओटेधारकांने स्वखर्चाने करावयाचे आहे . मात्र सदर ओटयात कोणत्याही प्रकाराचा फेरबदल करावयाचा नाही. दुरुस्तीसाठी महापालिकेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

8) सदर ओटयात स्पोटक किंवा ज्वालाग्राही सामान ठेवता येणार नाही.

9) विक्रीस ठेवलेल्या मालाचा निरुपयोगी भाग अगर कोणत्याही प्रकारची घाण मंडईमध्ये ठरविलेल्या जागीच टाकली पाहिजे इतरत्र कोठेही ठेवता येणार नाही.

10) सदर ओटयाचा विक्रेता किंवा नोकर हा संसर्गजन्य रोगापासून मुक्त असला पाहिजे.

11) वेळोवेळी ओटेधारकांची अगर त्याचे सेवकांची शारिरीक तपासणी व विक्री करिता ठेवलेल्या मालाची तपासणी महापालिकेचे आरोग्य अधिकारी अगर महापालिकेने पाठविलेल्या अन्य अधिकारी यांना करण्याचा अधिकार राहील.

12) उपयोगात आणणेची मापे व काटे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेतली असली पाहिजे.

13) सदर ओटेधारकाने वैयक्तिक रित्या किंवा सामुदायीक रित्या विज मिटर स्वतंत्र घ्यावा व विजेचे मिटर घेणेसाठी "ना हरकत दाखला" महानगरपालिकेकडून घ्यावा.

14) कोणत्याही ओटेधारकाला गिऱ्हाईकांच्या आकर्षणाकरीता कर्ण / कर्कश ध्वनीचा व त्यासंबंधी साहित्याचा उपयोग करता येणार नाही.

15) सदर ओटयाची आपणास दिलेली मुदत संपताच ओटयाची मालकी महापालिकेची असेल. त्याबद्दल कोणताही हक्क व नुकसान भरपाई मागता येणार नाही.

16) ओटेधारकांने ओटयाचे भाडे दर महिन्याच्या **10** तारखेच्या आत महापालिकेकडे आगाऊ भरले पाहिजे. दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधी थकीत राहिल्यास महापालिका कोणतीही पुर्व सुचना न देता महापालिका ओटा ताब्यात घेईल.

17) अर्जदार संस्थेने जागेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन प्रत्येकी जागेसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा . सदर जागा "जशी आहे तशी **"As in where is"** देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

18) अर्जदार संस्था मिरा -भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अर्ज सादर केल्यापासून मागील **3** वर्षे सामाजिक कार्यात कार्यरत असावी.

19) अर्जदार संस्थेस सलग **3** वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल **(Audit Report)** (ताळेबंद अहवाल) सादर करावे लागतील. महानगरपालिकेने निश्चित केलेले मासिक भाडे हे पायाभुत भाडेदर **(Base rate)** ठेऊन स्पर्धात्मक भाडेदर मागविण्यात येत आहेत. त्यामध्ये, जास्तीत जास्त भाडे देकार देणाऱ्या व्यक्ती / संस्थेस जागा भाडे कराराने देण्यात येईल.

20) सदर मिळकतीमध्ये कार्यरत असलेली व्यक्ती / संस्था स्पर्धात्मक दराने प्राप्त झालेल्या दराएवढे भाडेदर देण्यास तयार असल्यास (संस्थेने दरपत्रक उघडतेवेळी तसे लेखी दिल्यास ) अशावेळी संस्थेची निवड करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील.

आ) ज्या अर्जदार संस्था मासिक भाडे भरण्याचा पर्याय स्विकारतील अशा अर्जदार/ व्यक्ती/ संस्थांनी **11** महिन्याचे मासिक भाडे (डिमांड ड्राफ्ट **/post dated cheque)** व्दारे महानगरपालिकेस अदा करावे लागेल व सोबत अर्जदार संस्थेचे अर्जदार संस्थेचे ज्या बँकेत खाते असेल , (सध्या व्यवहार होत असलेले) त्या बँकेतील खाते क्रमांक व पासबुकातील पहिल्या पानाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

ब) **GST COUNCIL** यांचे दिनांक **19/05/2017** रोजीच्या मंजुरीनुसार **GST Reverse Charges VIDE SR.NO.6 (1)** अन्वये महानगरपालिकेच्या भाडे वसूली संदर्भात **Renting of immovable Property** वर दिनांक **01** जुलै **2017** पासून **18% GST (GOODS & SERVICE TAX)** लागु झाला आहे. संबंधीत अर्जदार /व्यक्ती /संस्थांना भाडयाच्या रक्कमेवर नियमानुसार अधिक वस्तु सेवा शुल्क **(GST)** व अन्य कर भरणा करणे बंधनकारक राहील.

क) अर्जदार संस्थेने ज्या दिवसापासून जागा वापरण्याकरीता घेतली आहे त्या दिवसापासूनचे भाडे भरणा करणे , अर्जदार संस्थेस दोन महिन्यापेक्षा जास्त भाडे थकीत केल्यास मासिक भाडयानुसार दरमहा **1%** प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

ड) अर्जदान संस्थेच्या त्या वर्षातील कामाचा आढावा घेऊन पुढील वर्षाकरीता मुदतवाढ देणे अथवा भाडेकरार रद्द करणे बाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त यांचा असेल.

23) संबंधीत संस्थांना विज देयक व पाणी देयक स्वतंत्रपणे अदा करावे लागेल व त्याची छायांकित प्रत वेळोवेळी महानगरपालिकेस उपलब्ध करुन द्यावी लागेल . सदरची देयके थकीत झाल्यास त्याच्या सुरक्षा अनामत रक्कमेतुन देयके भरणा करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

24) महापालिका मिळकतीमध्ये विदयुत व पाणी व्यवस्था नसल्यास अर्जदार संस्थेला ती स्वत: करावी लागेल व त्याकरीता आवश्यक नाहरकत दाखला महापालिकेकडून देण्यात येईल.

25) सद्यस्थितीत सदर जागा आधार नोंदणी. निवडणुक मतदार नोंदणी अथवा इतर मनपाच्या/ शासकीय कामाकारीता वापरात असेल किंवा पुर्नविकासाच्या प्रक्रियेत असेल तर सदरचे शासकीय काम पुर्नविकास पुर्ण झालेनंतर पात्र संस्थेला जागेचा ताबा देण्यात येईल व ताबा दिनांकापासून करारनामा व भाडे अस्तित्वात येईल.

26) जागा भाडयाने उपलबध करुन देणेकरीता प्राप्त देकार स्विकारणे अथवा नाकारणे किंवा एखादया संस्थेने एकापेक्षा जास्त जागांसाठी अर्ज केल्यास अशा संस्थेस किती जागा द्यावी याबाबतचे अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखून ठेवलेले आहेत.

27) नव्याने विकसित केलेल्या मंडईतील जागा निविदा प्रक्रीयेद्वारे देण्यात याव्यात.

<u>स्मशानभूमी/ दफनभूमी, विरंगुळा केंद्र, क्रिकेट पिच</u>

1) स्मशानभूमी, दफनभूमी संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल.
2) विरंगुळा केंद्र संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना मा . महासभा दि.**20/03/2013** ठराव क्र. **67** अन्वये निश्चित केलेल्या धोरणानूसार निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल.
3) क्रिकेट पीच दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रीया करुन संस्थेची निवड करण्यात येईल.

**दिर्घ मुदतीसाठी मालमत्ता भाड्याने देताना दर वर्षी 5 ते 10 टक्के भाडे वाढविण्यात येईल. तसेच मुदतीत भाडे न भरल्यास 18 टक्के व्याज आकारण्यात येईल. प्रस्तावित धोरण अंमलात येण्यापूर्वी ज्या मालमत्ता भाड्याने देण्यात आलेल्या आहेत व त्याची मुदत संपणे बाकी आहे त्याबाबतीत सदर धोरण लागू राहणार नाही.**

**शहरातील महानगरपालिकेच्या जागा, रस्ते, गटाराचा स्लॅब, पदपथावर व्यापारी/ दुकानदार/ गॅरेजवाले/ इतर हे विविध ठिकाणच्या जागा अनेक दिवसापासून वापरत आहेत . त्यांची व्यापारी तत्वासाठी जागेचा उपयोग केला असल्याने पूर्वलक्षी प्रभावाने त्यांचे कडून अनधिकृत वापरासाठी जागा भाडे वसूल करण्यात येईल.**

**शुटींगसाठी परवानगी न घेता शुटींग सुरू केलेले असेल तर हे भाडे दुप्पट वसूल करण्यात येईल. शुटींगसाठी अर्ज केला आणि परवानगीसाठी प्रभाग अधिकारीकडे प्रलंबित असले तरीही दुप्पट भाडे वसूली करण्यात येईल . यासाठी विषेश तरतुद करण्यात येत आहे.**

**ठराव :-**

**वरील विषयाचा गोषवारा उशिराने प्राप्त झाल्यामुळे सदरचा प्रस्ताव पुढील महासभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदक :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २४, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील हॉटेल वेदरशेडच्या दराबाबत फेरविचार करणेबाबत**.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश जैन :-**

मिरा भाईदर शहरात विद्यमान इमारतीमधील दुकानांसमोर / हॉटेलसमोरील मोकळ्या जागेवर वेदरशेड उभारण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज प्राप्त होत असतात. त्यानुसार संबंधीत अर्जदारास / मालकांस रु.२,५००/- इतके शुल्क आकारुन तात्पूरत्या स्वरुपात वेदरशेड उभारण्यास ६ महिन्याकरिता परवानगी देण्यात येत होती. परवानगीतील नमुद वेदरशेड खालील जागा वाणिज्य वापर करता येणार नाही अशा स्वरुपाची अट नमुद केलेली असतानाही खालील जागेचा वापर बहुतांशी ठिकाणी वाणिज्य वापरासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले असता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २२७/१(ब) अन्वये उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप वगैरे तात्पुरते उभारणेबाबत तरतुद आहे. तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत विनियम क्र. ५८-इ मध्ये तात्पूरते स्वरुपाची परवानगी देण्याची तरतूद आहे.

महानगपालिका परिसरातील बहुतांश इमारतीतील तळ मजला किंवा इमारतीवरील मजल्यावर दुकानासमोर पत्राशेड टाकून किंवा हॉटेलच्या आवारात शेड टाकून वाणिज्य वापर करित असल्याचे व त्यासाठी परवानगी घेतली जात नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे अशा वापरापासून महानगरापालिकेला कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नसल्यामुळे अश्या प्रकारे वापर करणा-याचे वेगळे सर्व्हेक्षण करुन त्यांना देखील परवानगी दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून वेदर शेड साठी परवानगी देताना वेदरशेड खालील जागेच्या मालकीहक्काचे कागदपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रासह महानगरपालिकेस सार्वजनिक वापरासाठी आवश्यकता वाटेल त्यावेळेस स्वखर्चाने जागा मोकळी करुन देणेबाबतचे हमीपत्र संबंधित जागामालक / अर्जदार यांचेकडून घेऊन व त्यासाठी १० चौ.मी क्षेत्राच्या मर्यादेत असलेल्या क्षेत्रासाठी रू.२५००/- आकारणी कायम ठेऊन १० चौ.मी च्यावर ५० चौ.मी क्षेत्रापर्यंत रु.३००/- प्रति चौ.मी. तसेच ५० चौ.मी. क्षेत्राच्यावर रु.४००/- प्रति चौ.मी. प्रति माह प्रमाणे आकारणी करुन महानगरपालिकेच्या मालकीची जागा वगळून वेदरशेडसाठी मंजूरी देणेबाबत मा. महासभा, ठराव क्र. ८३, प्रकरण क्र. ९०, दि.१६/०१/२००९ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

तसेच हॉटेल, सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, सार्वजनिक जागा, मोकळ्या जागा व अन्य व्यवसायिक वापराच्या जागासाठी रु.५/- प्रती चौ.फुट प्रमाणे कर आकारणी करणेबाबत दि.३१/१०/२०११ रोजी मा. महासभेने प्रकरण क्र. ६७, ठराव क्र. ७१ अन्वये मंजूरी दिलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही कर विभागामार्फत करणेत येत आहे.

वेदरशेडसाठी परवानगी देणेसाठी मा. महासभेने निश्चित केलेले दर जास्तीचे वाटत असल्यामुळे या प्रकारच्या वेदरशेडसाठी महानगरपालिकेची मंजूरी घेण्याचे प्रमाण फारच कमी झालेले असून त्याअनुषंगीक अनधिकृतपणे वेदरशेडची उभारणी करुन वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील निवासी वापरातील इमारतींवर तात्पुरत्या स्वरुपाच्या वेदरशेडसाठी ४ महिन्याऐवजी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत परवानगी देण्यात यावी व प्रत्येक वर्षी नुतनीकरण करण्यात यावे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बहुतांश इमारतींवर मोठ्या प्रमाणात टेरेसवर व तळमजल्यावर अनधिकृतपणे वेदरशेड उभारुन वाणिज्य वापर करीत आहे, त्यांना शास्तीसह कर आकारणी करण्यात यावी. शास्ती लावताना ज्या जागेवर अनधिकृत वेदरशेड उभारले आहे त्यावरच शास्ती लावावी तसेच ज्या मालकांनी अनधिकृतपणे वेदरशेड उभारले आहे त्याच मालकाच्या सदर इमारतीमधील वास्तुवर, सदनिका/गाळ्यांवर शास्ती लावावी त्या इमारतीमधील इतर सदनिका धारकांच्या जागेवर/गाळ्यांवर शास्ती लावू नये.

प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद केलेले हॉटेल व इतर वाणिज्य व्यवसायिकांबाबतचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे. आयुक्तांनी याबाबत इतर महापालिकांकडून माहिती घेऊन सदर प्रस्ताव फेर सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. २४ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील हॉटेल वेदरशेडच्या दराबाबत फेरविचार करणेबाबत**.

**ठराव क्र. २१ :-**

मिरा भाईंदर शहरात विद्यमान इमारतीमधील दुकानांसमोर / हॉटेलसमोरील मोकळ्या जागेवर वेदरशेड उभारण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज प्राप्त होत असतात. त्यानुसार संबंधीत अर्जदारास / मालकांस रु.२,५००/- इतके शुल्क आकारुन तात्पूरत्या स्वरुपात वेदरशेड उभारण्यास ६ महिन्याकरिता परवानगी देण्यात येत होती. परवानगीतील नमुद वेदरशेड खालील जागा वाणिज्य वापर करता येणार नाही अशा स्वरुपाची अट नमुद केलेली असतानाही खालील जागेचा वापर बहुतांशी ठिकाणी वाणिज्य वापरासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले असता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २२७/१(ब) अन्वये उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप वगैरे तात्पुरते उभारणेबाबत तरतुद आहे. तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत विनियम क्र. ५८-इ मध्ये तात्पूरते स्वरुपाची परवानगी देण्याची तरतूद आहे.

महानगपालिका परिसरातील बहुतांश इमारतीतील तळ मजला किंवा इमारतीवरील मजल्यावर दुकानासमोर पत्राशेड टाकून किंवा हॉटेलच्या आवारात शेड टाकून वाणिज्य वापर करित असल्याचे व त्यासाठी परवानगी घेतली जात नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे अशा वापरापासून महानगरापालिकेला कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नसल्यामुळे अश्या प्रकारे वापर करणा-याचे वेगळे सर्व्हेक्षण करुन त्यांना देखील परवानगी दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून वेदर शेड साठी परवानगी देताना वेदरशेड खालील जागेच्या मालकीहक्काचे कागदपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रासह महानगरपालिकेस सार्वजनिक वापरासाठी आवश्यकता वाटेल त्यावेळेस स्वखर्चाने जागा मोकळी करुन देणेबाबतचे हमीपत्र संबंधित जागामालक / अर्जदार यांचेकडून घेऊन व त्यासाठी १० चौ.मी क्षेत्राच्या मर्यादेत असलेल्या क्षेत्रासाठी रू.२५००/- आकारणी कायम ठेऊन १० चौ.मी च्यावर ५० चौ.मी क्षेत्रापर्यंत रु.३००/- प्रति

चौ.मी. तसेच ५० चौ.मी. क्षेत्राच्यावर रु.४००/- प्रति चौ.मी. प्रति माह प्रमाणे आकारणी करुन महानगरपालिकेच्या मालकीची जागा वगळून वेदरशेडसाठी मंजूरी देणेबाबत मा. महासभा, ठराव क्र. ८३, प्रकरण क्र. ९०, दि.१६/०१/२००९ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

तसेच हॉटेल, सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, सार्वजनिक जागा, मोकळ्या जागा व अन्य व्यवसायिक वापराच्या जागासाठी रु.५/- प्रती चौ.फुट प्रमाणे कर आकारणी करणेबाबत दि.३१/१०/२०११ रोजी मा. महासभेने प्रकरण क्र. ६७, ठराव क्र. ७१ अन्वये मंजूरी दिलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही कर विभागामार्फत करणेत येत आहे.

वेदरशेडसाठी परवानगी देणेसाठी मा. महासभेने निश्चित केलेले दर जास्तीचे वाटत असल्यामुळे या प्रकारच्या वेदरशेडसाठी महानगरपालिकेची मंजूरी घेण्याचे प्रमाण फारच कमी झालेले असून त्याअनुषंगीक अनधिकृतपणे वेदरशेडची उभारणी करुन वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील निवासी वापरातील इमारतींवर तात्पुरत्या स्वरुपाच्या वेदरशेडसाठी ४ महिन्याऐवजी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत परवानगी देण्यात यावी व प्रत्येक वर्षी नुतनीकरण करण्यात यावे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बहुतांश इमारतींवर मोठ्या प्रमाणात टेरेसवर व तळमजल्यावर अनधिकृतपणे वेदरशेड उभारुन वाणिज्य वापर करीत आहे, त्यांना शास्तीसह कर आकारणी करण्यात यावी. शास्ती लावताना ज्या जागेवर अनधिकृत वेदरशेड उभारले आहे त्यावरच शास्ती लावावी तसेच ज्या मालकांनी अनधिकृतपणे वेदरशेड उभारले आहे त्याच मालकाच्या सदर इमारतीमधील वास्तुवर, सदनिका/गाळ्यांवर शास्ती लावावी त्या इमारतीमधील इतर सदनिका धारकांच्या जागेवर/गाळ्यांवर शास्ती लावू नये.

प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद केलेले हॉटेल व इतर वाणिज्य व्यवसायिकांबाबतचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे. आयुक्तांनी याबाबत इतर महापालिकांकडून माहिती घेऊन सदर प्रस्ताव फेर सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २५, **मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस संचलनासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पध्दतीने घेणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत**.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM-II अंतर्गत प्राप्त बसेस दि.२५/१०/२०१५ पासून महानगरपालिका स्वतः चालवित आहे. त्याकरीता लागणारे चालक, वाहक, प्रवर्तक व तिकीट तपासणीस ठेका पद्धतीने घेण्यात येत आहेत.

सदरच्या बसेसचा उद्‌घाटन सोहळा दि.२४/१०/२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते करण्यात आला होता. तत्पूर्वी JnNURM-II अंतर्गत प्राप्त बसेस मनपा स्वतः चालवीत असल्याने व तातडीने दि.२५/१०/२०१५ पासून बस सेवा सुरु करणे आवश्यक असल्याने सदरकामी कर्मचारी ठेका पद्धतीने घेणे आवश्यक होते. महानगरपालिका विविध विभागातील वाहनाकरीता वाहन चालक पुरवठा करणेसाठी मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांचे दर मंजुर होते. तसेच त्यांना कल्याण-डोंबीवली महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी कर्मचारी पुरवठा केल्याचा अनुभव होता. त्यानुसार मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांचेकडून बस चालक, बस वाहक, तिकिट तपासणीस व प्रवर्तक पुरवठा करणेकामी दर मागविण्यात आले होते. मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांनी सादर केलेल्या दरामध्ये वाटाघाटी करुन मा.स्थायी समितीच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ५(२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहून ठेका पद्धतीने कर्मचारी पुरवठा करणेकामी दि.२३/१०/२०१५ रोजी कार्यादेश देण्यात आला होता.

उपरोक्त प्रमाणे तातडीने बस सेवा सुरु करण्यासाठी मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांचेकडून पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदरचे कर्मचारी ठेका पद्धतीने घेणेसाठी मा.स्थायी समिती सभा, ठराव क्र.१०९ दि.३०/११/२०१५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस GCC तत्वावर चालविणेसाठी मा.महासभा ठराव क्र.२१ दि.२८/०६/२०१६ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार एकूण चार वेळेसे निविदा प्रक्रिया करण्यात आली. चौथ्या निविदा सूचनेनुसार प्राप्त मे. श्यामा श्याम सर्विस सेंटर, दिल्ली यांची निविदा स्विकारणेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.५० दि.२९/०६/२०१७ अन्वये

मान्यता देण्यात आली होती. परंतु दरम्यानच्या कालावधीमध्ये सदर प्रकरणी मे. श्यामा श्याम सर्विस सेंटर यांचेकडून भ्रष्ट्र मार्ग अवलंब केल्याने त्यांना दिलेले Letter of Award मागे घेण्यात आलेले आहे.

वरीलप्रमाणे बस चालविणेसाठी कंत्राटदार नेमणेसाठी बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे मनपामार्फत बसेस चालविणेसाठी खालीलप्रमाणे कर्मचारी वर्गाची आवश्यकता असल्याबाबत आगार व्यवस्थापक (डेपो मॅनेजर) व ऑपरेशन मॅनेजर यांनी अहवाल दिले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्राप्त एकूण ५८ बसेसपैकी दैनंदिन (९०% बसेस) ५२ बसेस मार्गस्थ करण्यासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी वर्ग ठेका पद्धतीने घेणेसाठी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

**अ) बसगाडया देखभालीसाठी आगारामध्ये लागणारा कर्मचारी वर्ग**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | पर्यवेक्षक | ०४ | प्रत्येक पाळीमध्ये चालणा-या कामाचे परिक्षण व निर्णय घेणे. कामगारांना मार्गदर्शन करणे. जास्तीत जास्त बसगाडया मार्गस्थ करणे. |
| २. | मॅकेनीक | १० | बस गाडयांची दुरुस्ती व देखभाल. प्रिवेंटीव मेंटनन्स करणे जेणेकरुन मार्गावरील बिघाड शून्य व्हावा. काढलेली युनिटस् यांची दुरुस्ती. बस स्थानक रस्त्यावरील बस बिघाड दुरुस्ती. |
| ३. | इलेक्ट्रीशीयन | ०४ | विद्युत बिघाड दुरुस्ती व देखभाल |
| ४. | टायरमन | ०५ | टायर प्रेशर बरोबर ठेवणे. टायर दुरुस्ती व देखभाल टायर खोलणे व लावणे टायरचे परिक्षण व निर्णय. |
| ५. | बॉडी फिटर | ०३ | गाडीच्या बॉडीचे सर्व काम करणे.<br>(वेल्डींग येणे आवश्यक) |
| ६. | चालक | ०४ | बस गाडयांची ने-आण करणे. डिझेल भरणे, कामाच्या व धुण्याच्या बस गाडया पीटवर वॉशींग शेडमध्ये टाकणे. |
| ७. | लिपीक | ०४ | हजेरी, रेकॉर्ड मेंटेनन्स इत्यादी. |

**ब) तिकीट व रोख विभाग**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | लिपीक | १४ | रोख रक्कम स्विकारणे व तिकीट बंध वाटप, मेमो वाटप द्व ७, पर्यवेक्षक द्व १, ऑडीट लिपीक द्व ६ |

**क) वाहतूक अधिकारी, वाहतूक नियंत्रक, बस निरिक्षक व बस प्रवर्तक**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | वाहतूक अधिकारी | ०१ | बस निरिक्षक, बस प्रवर्तक वाहतूक नियंत्रणाचे कामकाजावर पर्यवेक्षण करणे. |
| २. | वाहतूक नियंत्रक | ०२ | संपूर्ण बसेस टर्न आऊट नियंत्रण. |
| ३. | बस निरिक्षक | ३० | तिकीट तपासणीस (बीट निहाय) |
| ४. | बस प्रवर्तक | ३२ | बस चौकी व डेपो बस प्रवर्तनाचे काम. |

**ड) बस चालक व बस वाहक (एकूण ताब्यात घेतलेल्या ५८ बसेसपैंकी ५२ बसेस टर्नआऊटच्या अनुषंगाने)**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | बस चालक | १२६ | बस चालक |
| २. | बस वाहक | १२६ | बस वाहक |

**ठराव :-**

महानगरपालिका परिवहन विभागाच्या बसेस चालविणेसाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पद्धतीने घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.१५.०० कोटी इतका वार्षिक खर्च अपेक्षीत आहे. तसेच उर्वरीत बसेस देखील ताब्यात घेतल्यानंतर आवश्यकते प्रमाणे कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक आहे. त्यानुसार खर्चात देखील वाढ होणार आहे. सदरकामी अंदाजपत्रकातील नमुद (अ) महसुली खर्च (८) बस चालविणेसाठी येणारा खर्च या लेखाशिर्षात तरतूद उपलब्ध आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस चालविण्यासाठी बस ऑपरेटर नियुक्त होईपर्यंत महानगरपालिकेमार्फत बसेस संचलनासाठी लागणारे कर्मचारी निविदा मागवून ठेका पद्धतीने घेणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस ही मा. महासभा मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**डॉ. सुशिल अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांना मी रिक्वेस्ट करते. तुम्ही बसून जा. मी ठराव मंजूर करत आहे.. पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. २५ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस संचलनासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पध्दतीने घेणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत**.

**ठराव क्र. २२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM-II अंतर्गत प्राप्त बसेस दि.२५/१०/२०१५ पासून महानगरपालिका स्वतः चालवित आहे. त्याकरीता लागणारे चालक, वाहक, प्रवर्तक व तिकीट तपासणीस ठेका पद्धतीने घेण्यात येत आहेत.

सदरच्या बसेसचा उद्घाटन सोहळा दि.२४/१०/२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते करण्यात आला होता. तत्पूर्वी JnNURM-II अंतर्गत प्राप्त बसेस मनपा स्वतः चालवीत असल्याने व तातडीने दि.२५/१०/२०१५ पासून बस सेवा सुरु करणे आवश्यक असल्याने सदरकामी कर्मचारी ठेका पद्धतीने घेणे आवश्यक होते. महानगरपालिका विविध विभागातील वाहनाकरीता वाहन चालक पुरवठा करणेसाठी मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांचे दर मंजुर होते. तसेच त्यांना कल्याण-डोंबीवली महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी कर्मचारी पुरवठा केल्याचा अनुभव होता. त्यानुसार मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांचेकडून बस चालक, बस वाहक, तिकिट तपासणीस व प्रवर्तक पुरवठा करणेकामी दर मागविण्यात आले होते. मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांनी सादर केलेल्या दरामध्ये वाटाघाटी करुन मा.स्थायी समितीच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ५(२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहून ठेका पद्धतीने कर्मचारी पुरवठा करणेकामी दि.२३/१०/२०१५ रोजी कार्यादेश देण्यात आला होता.

उपरोक्त प्रमाणे तातडीने बस सेवा सुरु करण्यासाठी मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांचेकडून पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदरचे कर्मचारी ठेका पद्धतीने घेणेसाठी मा.स्थायी समिती सभा, ठराव क्र.१०९ दि.३०/११/२०१५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस GCC तत्वावर चालविणेसाठी मा.महासभा ठराव क्र.२१ दि.२८/०६/२०१६ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार एकूण चार वेळेसे निविदा प्रक्रिया करण्यात आली. चौथ्या निविदा सूचनेनुसार प्राप्त मे. श्यामा श्याम सर्विस सेंटर, दिल्ली यांची निविदा स्विकारणेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.५० दि.२९/०६/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली होती. परंतु दरम्यानच्या कालावधीमध्ये सदर प्रकरणी मे. श्यामा श्याम सर्विस सेंटर यांचेकडून भ्रष्ट्र मार्ग अवलंब केल्याने त्यांना दिलेले Letter of Award मागे घेण्यात आलेले आहे.

वरीलप्रमाणे बस चालविणेसाठी कंत्राटदार नेमणेसाठी बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे मनपामार्फत बसेस चालविणेसाठी खालीलप्रमाणे कर्मचारी वर्गाची आवश्यकता असल्याबाबत आगार व्यवस्थापक (डेपो मॅनेजर) व ऑपरेशन मॅनेजर यांनी अहवाल दिले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्राप्त एकूण ५८ बसेसपैकी दैनंदिन (९०% बसेस) ५२ बसेस मार्गस्थ करण्यासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी वर्ग ठेका पद्धतीने घेणेसाठी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

**अ) <u>बसगाडया देखभालीसाठी आगारामध्ये लागणारा कर्मचारी वर्ग</u>**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | पर्यवेक्षक | ०४ | प्रत्येक पाळीमध्ये चालणा-या कामाचे परिक्षण व निर्णय घेणे. कामगारांना मार्गदर्शन करणे. जास्तीत जास्त बसगाडया मार्गस्थ करणे. |
| २. | मॅकेनीक | १० | बस गाडयांची दुरुस्ती व देखभाल. प्रिवेंटीव मेंटनन्स करणे जेणेकरुन मार्गावरील बिघाड शून्य व्हावा. काढलेली युनिटस् यांची दुरुस्ती. बस स्थानक रस्त्यावरील बस बिघाड दुरुस्ती. |
| ३. | इलेक्ट्रीशीयन | ०४ | विद्युत बिघाड दुरुस्ती व देखभाल |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | टायरमन | ०५ | टायर प्रेशर बरोबर ठेवणे. टायर दुरुस्ती व देखभाल टायर खोलणे व लावणे टायरचे परिक्षण व निर्णय. |
| ५. | बॉडी फिटर | ०३ | गाडीच्या बॉडीचे सर्व काम करणे.<br>(वेल्डींग येणे आवश्यक) |
| ६. | चालक | ०४ | बस गाडयांची ने-आण करणे. डिझेल भरणे, कामाच्या व धुण्याच्या बस गाडया पीटवर वॉशींग शेडमध्ये टाकणे. |
| ७. | लिपीक | ०४ | हजेरी, रेकॉर्ड मेंटेनन्स इत्यादी. |

**ब) तिकीट व रोख विभाग**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | लिपीक | १४ | रोख रक्कम स्विकारणे व तिकीट बंध वाटप, मेमो वाटप द्व ७, पर्यवेक्षक द्व १, ऑडीट लिपीक द्व ६ |

**क) वाहतूक अधिकारी, वाहतूक नियंत्रक, बस निरिक्षक व बस प्रवर्तक**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | वाहतूक अधिकारी | ०१ | बस निरिक्षक, बस प्रवर्तक वाहतूक नियंत्रणाचे कामकाजावर पर्यवेक्षण करणे. |
| २. | वाहतूक नियंत्रक | ०२ | संपूर्ण बसेस टर्न आऊट नियंत्रण. |
| ३. | बस निरिक्षक | ३० | तिकीट तपासणीस (बीट निहाय) |
| ४. | बस प्रवर्तक | ३२ | बस चौकी व डेपो बस प्रवर्तनाचे काम. |

**ड) बस चालक व बस वाहक (एकूण ताब्यात घेतलेल्या ५८ बसेसपैंकी ५२ बसेस टर्नआऊटच्या अनुषंगाने)**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | बस चालक | १२६ | बस चालक |
| २. | बस वाहक | १२६ | बस वाहक |

**ठराव :-**

महानगरपालिका परिवहन विभागाच्या बसेस चालविणेसाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पद्धतीने घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.१५.०० कोटी इतका वार्षिक खर्च अपेक्षीत आहे. तसेच उर्वरीत बसेस देखील ताब्यात घेतल्यानंतर आवश्यकते प्रमाणे कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक आहे. त्यानुसार खर्चात देखील वाढ होणार आहे. सदरकामी अंदाजपत्रकातील नमुद (अ) महसुली खर्च (८) बस चालविणेसाठी येणारा खर्च या लेखाशिर्षात तरतूद उपलब्ध आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस चालविण्यासाठी बस ऑपरेटर नियुक्त होईपर्यंत महानगरपालिकेमार्फत बसेस संचलनासाठी लागणारे कर्मचारी निविदा मागवून ठेका पद्धतीने घेणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस ही मा. महासभा मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- डॉ. सुशिल अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २६, **मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र**. ३२६-**अ येथे विकसित होत असलेल्या बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता** HSD **सह** Bio-Diesel **मिश्रीत डिझेल** (Mixture of EURO-IV STD **करिता देकार मागविणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत**.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय मिनिट्स येतील ह्या इतिवृत्तांमधील ह्या विषयाचे. आम्ही तुम्हाला थांबवायचा प्रयत्न केला. शिस्तभंगाची कारवाई तुमच्यावर होईल.
(सभागृहात गोंधळ)

**गिता जैन :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाअंतर्गत घोडबंदर (आरक्षण क्र.३२६-अ) येथे डिझेल पंप घेणेकरीता शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्याकडून देकार मागविणेस मा.महासभा ठराव क्र.३१ दि.१९/०६/२०१७ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार HSD Confirming to specification No. as per Is १४६०/२००५ (5th revision) प्रकारचे डिझेल पुरवविण्यासाठी शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून देकार मागविण्यात येत आहेत.

तथापि, Bio-Diesel (ए-१००) मिश्रीत डिझेल करीता देखील देकार मागविणे आवश्यक आहे. Bio-Diesel हे पर्यावरण युक्त असल्याने प्रदुषणामध्ये घट होणेस मदत होऊ शकेल. हाई स्पीड डिझेल मिश्रीत Bio-Diesel विक्रीसाठी परवानगी देण्याबाबत पेट्रोलियम व नॅचरल गॅस मंत्रालय यांचेकडील अधिसूचना दि.१० ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिद्ध केलेली आहे. त्यानुसार रेल्वे, राज्य परिवहन उपक्रम व किमान आवश्यकता १२००० लिटर्स असणा-या उपभोक्त्याला Bio-Diesel वापरासाठी परवानगी मिळू शकते. सदर अधिसूचनेनुसार शासकीय पेट्रोलियम कंपन्या, खाजगी Bio-Diesel उत्पादक, त्यांचे अधिकृत विक्रेते व केंद्र सरकारने अधिकृत केलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील संयुक्त कंपनी इ. द्वारे पुरवठा करण्याचे नमूद केलेले आहे.

**ठराव :-**

मा. महासभा ठराव क्र.३१ दि.१९/०६/२०१७ अन्वये मंजुरी दिल्यानुसार शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून HSD डिझेलसाठी देकार मागविणेबाबत Bio-Diesel (ए-१००) मिश्रीत डिझेल (Mixture of EURO-IV STD) करीता देखील देकार मागविणेबाबतच्या सर्व तांत्रिक बाबी तपासून निविदा मागविण्यांत याव्या. जे डिझेल मनपाच्या वाहनांसाठी फायदेशीर व योग्य असेल त्याच निविदा स्विकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना देणेत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांना मी विनंती करत आहे. तुम्ही सगळे बसून जा. शांततेत सभा चालु द्या. तुम्ही चुकीच केलेले आहे. तुम्ही बसा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुम्ही शांततेत बसा. पक्षांना नाही करायचे आहे तर का करु. सन्मा. सदस्यांनी बसून जा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

तशी कायद्यात प्रोव्हिजन नाही. स्थगितीला प्रोव्हिजन नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सगळ्यांनी बसून घ्या. शांततेने निर्णय घेऊ. निर्णय आल्यावर डिक्लेयर करु. प्रविण पाटीलजी तुम्हाला एवढी काय घाई आहे. शासन निर्णय आल्यावर निर्णय घ्या.

**मा. उपमहापौर :-**

दोन दिवसाचा प्रश्न आहे मत मागितले आहे. आम्ही काही चूकीचे करतो का?

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पूढचा विषय घ्या. आप लोक अपने जगह पर बैठ जाईए यह लास्ट वॉर्निंग है।

**प्रकरण क्र. २६ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र**. ३२६-**अ येथे विकसित होत असलेल्या बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता** HSD **सह** Bio-Diesel **मिश्रीत डिझेल** (Mixture of EURO-IV STD **करिता देकार मागविणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत**.

**ठराव क्र. २३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाअंतर्गत घोडबंदर (आरक्षण क्र.३२६-अ) येथे डिझेल पंप घेणेकरीता शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्याकडून देकार मागविणेस मा.महासभा ठराव क्र.३१ दि.१९/०६/२०१७ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार HSD Confirming to specification No. as per Is १४६०/२००५ (5th revision) प्रकारचे डिझेल पुरवविण्यासाठी शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून देकार मागविण्यात येत आहेत.

तथापि, Bio-Diesel (ए-१००) मिश्रीत डिझेल करीता देखील देकार मागविणे आवश्यक आहे. Bio-Diesel हे पर्यावरण युक्त असल्याने प्रदुषणामध्ये घट होणेस मदत होऊ शकेल. हाई स्पीड डिझेल मिश्रीत Bio-Diesel विक्रीसाठी परवानगी देण्याबाबत पेट्रोलियम व नॅचरल गॅस मंत्रालय यांचेकडील अधिसूचना दि.१० ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिद्ध केलेली आहे. त्यानुसार रेल्वे, राज्य परिवहन उपक्रम व किमान आवश्यकता

१२००० लिटर्स असणा-या उपभोक्त्याला Bio-Diesel वापरासाठी परवानगी मिळू शकते. सदर अधिसूचनेनुसार शासकीय पेट्रोलियम कंपन्या, खाजगी Bio-Diesel उत्पादक, त्यांचे अधिकृत विक्रेते व केंद्र सरकारने अधिकृत केलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील संयुक्त कंपनी इ. द्वारे पुरवठा करण्याचे नमूद केलेले आहे.

**ठराव :-**

मा. महासभा ठराव क्र.३१ दि.१९/०६/२०१७ अन्वये मंजुरी दिल्यानुसार शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून HSD डिझेलसाठी देकार मागविणेबाबत Bio-Diesel (ए-१००) मिश्रीत डिझेल (Mixture of EURO-IV STD) करीता देखील देकार मागविणेबाबतच्या सर्व तांत्रिक बाबी तपासून निविदा मागविण्यांत याव्या. जे डिझेल मनपाच्या वाहनांसाठी फायदेशीर व योग्य असेल त्याच निविदा स्विकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना देणेत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. गिता जैन अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभागृहात गोंधळ)

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २७, **अपंग कल्याण योजना धोरण निश्चित करणे व मतिमंद विद्यार्थ्यांकरिता शाळा सुरु करणेबाबत**.

**मा. उपमहापौर :-**

आपणा सर्वांना विनंती करण्यांत येते जे ऐकण्याच्या मनस्थितीत आहेत त्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महनगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये "अंध व अपंग कल्याण" या लेखाशिर्षकाखाली विविध योजना राबविणेकामी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.१ कोटीं इतकी रक्कम प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तरी सन २०१७-१८ या वर्षापासुन मिरा भाईंदर क्षेत्रातील अपंग व्यक्तीसाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

**१) अंपग व्यक्तींना स्टॉल परवाना देणेबाबत :-**

| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
|---|---|
| **स्टॉल परवाना मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** | १) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिका-याचा दाखला<br>२) स्टॉलधारक लाभार्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कमीत कमी १० वर्षापासून रहिवासी असलेबाबतचा दाखला.(भाडेतत्त्वावर असलेबाबतचा करारनामा)<br>३) शिधापत्रिकेची छायांकित सत्यप्रत<br>४) आधारकार्ड छायांकित सत्यप्रत.<br>५) बँक पासबुकची छायांकित प्रत<br>६) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र. |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) स्टॉल परवाना हे फक्त अपंग धारकांसाठी असेल.<br>२) स्टॉल लाभार्थ्यांला परवाना मिळालेनंतर प्रत्येकी रु.२५,०००/- रक्कम महानगरपालिका अपंग कल्याण विभागकडून व्यवसायाकरीता त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.<br>३) प्रभाग निहाय स्टॉलची संख्या, त्या प्रभागांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असावी. जागा निश्चिती सार्वजनिक बांधकाम विभाकडून करणे व त्यानुसार सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे. त्यांना स्टॉल देणे व उर्वरीत स्टॉल परवान्यांसाठी नविन अर्ज स्विकारणे तसेच ज्या प्रभागातमागणी नाही त्या प्रभागात मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने स्टॉल परवाना दिला जाईल. अर्जदार त्याच वॉर्डमधील असावा. जर अर्ज जास्त असेल तर लॉटरी पध्दतीने स्टॉल दिले जातील.<br>४) प्रभागनिहाय जागा निश्चिती झालेनंतर दर ५ वर्षांनी त्याबाबत आढावा घेण्यात येईल.<br>५) स्टॉलचा वापर योग्य रितीने व नियम, अटीशर्ती प्रमाणे होत असल्याची तपासणी दरवर्षी बांधकाम/प्रभाग अधिकारी/ज्युनिअर |

| | |
|---|---|
| | इंजिनिअर मार्फत होईल. स्टॉलधारकाने नुतनीकरण करताना मागील वर्षात त्याने नियम/अटींचा भंग केला नाही असे प्रमाणपत्र संबंधित प्रभाग अधिकारी/ज्युनिअर इंजिनिअर (बांध) यांचे मार्फत सादर करणे बंधनकारक राहील. रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे, त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना करण्यात येईल.<br>६) अनुज्ञेय व्यतीरिक्त अन्य वापर चालु असल्यास, स्टॉल परवारा रद्द करणे, एकदा स्टॉल दिल्यावर सदर स्टॉल ५ वर्षासाठी परवाना देण्यात येईल. त्या नंतर नुतनीकरणाबाबत फेरतपासणी करण्यात येईल.<br>७) ज्या व्यक्ती व ज्या कारणासाठी स्टॉल दिला आहे. त्यानुसार वापर न केल्यास किंवा भाडयाने दिल्यास, अतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास, छपरा टाकल्यास स्टॉलधारकांवर जप्ती व गुन्हा दाखल करण्यात येईल, व ज्याने भाडयाने घेतला असेल त्याचेवरही गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच स्टॉलसंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास स्टॉल परवाना निलंबन करुन रद्द करण्यात येईल.<br>८) आरे सरीता किंवा महानंदा दुध स्टॉल यांना दिलेल्या स्टॉलचे फक्त नुतनीकरण करता येईल.<br>९) दोन स्टॉलमध्ये कमीत कमी ५०० मी. चे अंतर असणे आवश्यक आहे.<br>१०) प्रभाग अधिकारी व वाहतूक पोलिस निरिक्षक यांच्या स्टॉल जागेसंबंधीचा अभिप्राय घेण्याची जबाबदारी स्टॉल लाभधारकाकडे राहील व तशा अहवालानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.<br>११)सद्यस्थितीत अपंग परवाना देणेसाठी टेलिफोन बुथचा विचार केला जातो. परंतु सद्या हा व्यवसाय कालबाहय झाला असून टेलिफोन बुथ व तत्सम या व्यवसाय व्यतिरीक्त जनरल सामानाची विक्री, किरकोळ सामान विक्री, भाजीपाला, फळे व दैनदिन लागणा-या वस्तूंची विक्री, घरघंटी, झेरॉक्स मशिन, ई-बुकींग/रेल्वे रिझर्वेशन, भाजी, फळे, फुले, डेअरी उत्पादन, रोजवापरासाठी लागणा-या वस्तु, वर्तमानपत्र, मासिके व वेळोवेळी मा. महासभेने सुचविलेल्या व्यवसाय इ. |

२) **योजनेचे नांव :-** शासन परिपत्रक क्र. - न्यायाप्र/२०११/प्र.क्र/सुधार - ३ यानुसार महानगरपालिकेमधील आस्थापनेवरील वर्ग ३ व ४ यामध्ये काम करीत असलेल्या व भविष्यात आस्थापनेवर रुजू होणा-या अपंग कर्मचा-यांना त्यांच्या सोयीनुसार लागणारे साहित्य/उपकरणे वाटप

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) मनपा आस्थापनेवर वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये अपंग व्यक्ती कार्यरत असावी.
२) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिका-याचा दाखला
**३)** महानगरपालिकेमध्ये आस्थापनावरील कर्मचारी असल्याचे नेमणूक पत्र.
**४)** आधार कार्डची छायांकित प्रत.

**३) अंपग व्यक्तींना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण :-**

| **योजनेचा उद्देश -** | अपंग व्यक्तींना त्यांच्या सोईनुसार प्रशिक्षण देवून त्यांना कार्यक्षम बनविणे. |
|---|---|
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षे वास्तव असल्याचा दाखला.<br>२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिका-याचा दाखला<br>३) जन्म दाखला.<br>४) शिधापत्रकाची सत्यपत्र<br>५) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र.<br>६) आधार कार्डची छायांकित प्रत. |

४) **अपंग व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरविणे -**

| **योजनेचा उद्देश -** | अपंग व्यक्तींना त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिव्यंग, कर्णबधीर, अंध व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरवून त्यांना स्वावलंबी बनविणे. |
|---|---|

| कार्यक्षेत्र | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
|---|---|
| योजनेच्या अटीशर्ती | १) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षे वास्तव असल्याचा दाखला.<br>२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिका-याचा दाखला<br>३) जन्म दाखला.<br>४) शिधापत्रकाची सत्यपत्र<br>५) आधार कार्डची छायांकित प्रत<br>६) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र. |

**५) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अपंग विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.**

**शिष्यवृत्ती :-**

| शिक्षण | सध्या देण्यात येणारी शिष्यवृत्ती | नव्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिष्यवृत्ती |
|---|---|---|
| **१ ते ४** | **२५००** | **प्रति माह रु.१०००/- प्रमाणे रु.१२,०००/- वार्षिक** |
| **५ ते ७** | **४०००** | **प्रति माह रु.१५००/- प्रमाणे रु.१८,०००/- वार्षिक** |
| **८ ते १०** | **६०००** | **प्रति माह रु.१५००/- प्रमाणे रु.१८,०००/- वार्षिक** |
| **११ ते १२** | **८०००** | **प्रति माह रु.२०००/- प्रमाणे रु.२४,०००/- वार्षिक** |
| **१२ ते पदवी** | **१०,०००** | **प्रति माह रु.२०००/- प्रमाणे रु.२४,०००/- वार्षिक** |

**योजनेच्या अटीशर्ती :-**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ३ वर्षाचे वास्तव्याचा दाखला पाहिजे.
२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्याचा सक्षम प्राधिका-याचा दाखला.
३) जन्म दाखला.
४) शिधापत्रकेची सत्यप्रत.
५) अर्जदाराने मागील शैक्षणिक वर्षात शिक्षण पूर्ण केलेले असावे, सोबत मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. किंवा नविन प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश अर्जाची सत्यप्रत जोडावी.
६) शैक्षणिक फी संबधी मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/कॉलेजमध्ये शिक्षण घेत असल्याचे प्रमाणपत्र जोडावे.
७) अर्जा सोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.
८) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजुर करण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.
९) बॅक पासबुकची छायांकित प्रत.
१०) आधार कार्डची छायांकित प्रत.

**६) अंध व अपंग व्यक्तीला वैद्यकीय उपचाराकरीता वैद्यकीय विमा –**

| योजनेचा उद्देश - | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना वैद्यकीय उपचाराकरीता आर्थिक मदत म्हणुन रु.२,००,०००/- पर्यंत वैद्यकीय विमा काढणे. |
|---|---|
| कार्यक्षेत्र | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| योजनेच्या अटीशर्ती | १) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला<br>२) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र.<br>३) घर/सदनिका मालक असल्यास १ वर्षापुर्वीचा रहिवास पुरावा<br>४) भाडेकरु असल्यास ३ वर्षापुर्वीचा रहिवास पुरावा.<br>५) आधारकार्डची छायांकित प्रत.<br>६) वैद्यकीय उपचाराकरीता महानगरपालिकेमार्फत मेडीक्लेम पॉलीसी घेवुन १०० % मेडीक्लेमची रक्कम महापालिका भरणा करेल |

**७) अपंग व्यक्तींना रोजगारासाठी व बिजभांडवलासाठी आर्थिक मदत करणे. –**

| योजनेचा उद्देश - | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीजभांडवल उपलब्ध करुन देणे या योजने अंतर्गत जे अपंग लाभार्थी छोटया उदयोजकातील स्वयंरोजगार करण्यासाठी |
|---|---|

| | |
|---|---|
| | मान्यता प्राप्त बँकेकडुन प्रकल्प खर्चाची मर्यादा रु.३,००,०००/- पर्यंत कर्ज पुरवठा घेतल्यास रु.१,००,०००/- रक्कम हि अनुदान म्हणुन देण्यात येईल. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) ४० ऽ व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला<br>२) मान्यता प्राप्त बँकेकडुन कर्ज मंजुर केलेले पत्र.<br>३) रहिवास दाखला (किमान सात वर्ष)<br>४) आधार कार्डची छायांकित प्रत. |

८) **अपंग व्यक्तींना उदरनिवाह साठी व्यवसायाकरीता साहित्य खरेदीसाठी अनुदान –**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेले साहित्य साठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. (प्रति लाभार्थी रु.२०,०००/- प्रमाणे) |
| **साहित्य :-** | शिलाई मशिन (मोटारसहित), घरघंटी मशिन, डिपफ्रिजर, सॉफ्टी आईस्क्रीम मशिन, शितपेय ठेवण्यासाठीचे फ्रिज इ. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला<br>२) रहिवास दाखला (किमान सात वर्ष)<br>३) आधार कार्डची छायांकित प्रत.<br>४) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र.<br>५) शिधापत्रिकेची छायांकित प्रत |

९) **अपंगांच्या क्रीडा, चित्रकला, हस्तकला इ. स्पर्धा आयोजित करणे.**

१०) **अपंगाच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे :-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या अपंग व अव्यंग विवाहितांना लग्नासाठी रु.५०,०००/- अर्थसहाय्य करणेबाबत. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) वधू अथवा वराकडे अपंग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असावे.<br>२) अपंग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.<br>३) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी.<br>४) विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.<br>५) विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत समाजकल्याण अधिकारी यांचेडकडे अर्ज करणे आवश्यक आहे.<br>६) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र.<br>७) शिधापत्रिकेची छायांकित प्रत.<br>८) आधारकार्डची छायांकित प्रत. |

**११) अपंग व्यक्तींना आर्थिक मदत.:-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात येईल. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** | १) ४०% व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला<br>२) रहिवास दाखला (किमान सात वर्ष)<br>३) आधार कार्डची छायांकित प्रत. |

| | |
|---|---|
| | ४) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र.<br>५) शिधापत्रिकेची छायांकित प्रत<br>६) बँक खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) सदर योजनेचा लाभ ५० वर्षाच्या वरील तसेच अपंगत्व ७०% च्या वर असल्यास रु.२०००/- प्रती महिना लाभ देण्यात येईल.<br>२) सदर योजनेचा लाभ ५० वर्षाच्या आतील तसेच अपंगत्व ४०% ते ७०% च्या वर असल्यास रु.१५००/- प्रती महिना लाभ देण्यात येईल.<br>३) मतिमंद मुलांना रु.२०००/- प्रती महिना लाभ देण्यात येईल. |

**१२)मतिमंद मुलांसाठी शाळा:-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात येईल. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजना राबविणेसाठी आवश्यक अधिकारी तसेच कर्मचारी** | सदर योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या अपंग मतिमंद मुलांसाठी शाळा सुरु करावयाची असुन असुन सदर शाळेसाठी खालीलप्रमाणे अधिकारी तसेच कर्मचारी आवश्यक आहेत.<br>१) मनोचिकित्सक - आवश्यकतेनुसार<br>२) शिक्षक - आवश्यकतेनुसार<br>३) लिपिक - आवश्यकतेनुसार<br>४) अपंग मुलांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक – आवश्यकतेनुसार<br>५) शिपाई - आवश्यकतेनुसार |

**१३)अपंग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे:-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या अपंग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| | अपंग व्यक्तींची नोंदणी करण्यासाठी सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत. |

**ठराव :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील अपंग कल्याण योजना धोरण निश्चित व मतिमंद विद्यार्थ्यांकरीता शाळा सुरु करणेबाबत धोरण ठरविणे व निर्णय घेणेकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | अध्यक्ष |
| २. | मा. उप-महापौर, | सदस्य |
| ३. | मा. स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | मा. सभागृह नेते, | सदस्य |
| ५. | संबंधीत खात्याचे विभागप्रमुख | सदस्यसचिव |

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी.

तरी वरील समितीने शिफारस केलेल्या निर्णयानूसार अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. २७ :-**

**अपंग कल्याण योजना धोरण निश्चित करणे व मतिमंद विद्यार्थ्यांकरिता शाळा सुरु करणेबाबत**.

**ठराव क्र. २४ :-**

मिरा भाईंदर महनगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये “अंध व अपंग कल्याण” या लेखाशिर्षकाखाली विविध योजना राबविणेकामी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.१ कोटीं इतकी रक्कम प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तरी सन २०१७-१८ या वर्षापासुन मिरा भाईंदर क्षेत्रातील अपंग व्यक्तीसाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

**१) अंपग व्यक्तींना स्टॉल परवाना देणेबाबत :-**

| कार्यक्षेत्र | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
|---|---|
| स्टॉल परवाना मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे | १) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला<br>२) स्टॉलधारक लाभार्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कमीत कमी १० वर्षापासून रहिवासी असलेबाबतचा दाखला.(भाडेतत्त्वावर असलेबाबतचा करारनामा)<br>३) शिधापत्रिकेची छायांकित सत्यप्रत<br>४) आधारकार्ड छायांकित सत्यप्रत.<br>५) बँक पासबुकची छायांकित प्रत<br>६) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र. |
| योजनेच्या अटीशर्ती | १) स्टॉल परवाना हे फक्त अपंग धारकांसाठी असेल.<br>२) स्टॉल लाभार्थ्यांला परवाना मिळालेनंतर प्रत्येकी रु.२५,०००/- रक्कम महानगरपालिका अपंग कल्याण विभागकडून व्यवसायाकरीता त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.<br>३) प्रभाग निहाय स्टॉलची संख्या, त्या प्रभागांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असावी. जागा निश्चिती सार्वजनिक बांधकाम विभाकडून करणे व त्यानुसार सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे. त्यांना स्टॉल देणे व उर्वरीत स्टॉल परवान्यांसाठी नविन अर्ज स्विकारणे तसेच ज्या प्रभागातमागणी नाही त्या प्रभागात मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने स्टॉल परवाना दिला जाईल. अर्जदार त्याच वॉर्डमधील असावा. जर अर्ज जास्त असेल तर लॉटरी पध्दतीने स्टॉल दिले जातील.<br>४) प्रभागनिहाय जागा निश्चिती झालेनंतर दर ५ वर्षांनी त्याबाबत आढावा घेण्यात येईल.<br>५) स्टॉलचा वापर योग्य रितीने व नियम, अटीशर्ती प्रमाणे होत असल्याची तपासणी दरवर्षी बांधकाम/प्रभाग अधिकारी/ज्युनिअर इंजिनिअर मार्फत होईल. स्टॉलधारकाने नुतनीकरण करताना मागील वर्षात त्याने नियम/अटींचा भंग केला नाही असे प्रमाणपत्र संबंधित प्रभाग अधिकारी/ज्युनिअर इंजिनिअर (बांध) यांचे मार्फत सादर करणे बंधनकारक राहील. रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे, त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना करण्यात येईल.<br>६) अनुज्ञेय व्यतीरिक्त अन्य वापर चालु असल्यास, स्टॉल परवारा रद्द करणे, एकदा स्टॉल दिल्यावर सदर स्टॉल ५ वर्षासाठी परवाना देण्यात येईल. त्या नंतर नुतनीकरणाबाबत फेरतपासणी करण्यात येईल.<br>७) ज्या व्यक्ती व ज्या कारणासाठी स्टॉल दिला आहे. त्यानुसार वापर न केल्यास किंवा भाडयाने दिल्यास, अतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास, छपरा टाकल्यास स्टॉलधारकांवर जप्ती व गुन्हा दाखल करण्यात येईल, व ज्याने भाडयाने घेतला असेल त्याचेवरही गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच स्टॉलसंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास स्टॉल परवाना निलंबन करुन रद्द करण्यात येईल.<br>८) आरे सरीता किंवा महानंदा दुध स्टॉल यांना दिलेल्या स्टॉलचे फक्त नुतनीकरण करता येईल.<br>९) दोन स्टॉलमध्ये कमीत कमी ५०० मी. चे अंतर असणे आवश्यक आहे.<br>१०) प्रभाग अधिकारी व वाहतूक पोलिस निरिक्षक यांच्या स्टॉल जागेसंबंधीचा अभिप्राय घेण्याची जबाबदारी स्टॉल लाभधारकाकडे राहील व तशा अहवालानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.<br>११)सद्यस्थितीत अपंग परवाना देणेसाठी टेलिफोन बुथचा विचार केला जातो. परंतु सद्या हा व्यवसाय कालबाहय झाला असून टेलिफोन बुथ व तत्सम या व्यवसाय व्यतिरीक्त जनरल सामानाची विक्री, किरकोळ सामान विक्री, भाजीपाला, फळे व दैनंदिन लागणाऱ्या |

| | |
|---|---|
| | वस्तूंची विक्री, घरघंटी, झेरॉक्स मशिन, ई-बुकींग/रेल्वे रिझर्वेशन, भाजी, फळे, फुले, डेअरी उत्पादन, रोजवापरासाठी लागणाऱ्या वस्तु, वर्तमानपत्र, मासिके व वेळोवेळी मा. महासभेने सुचविलेल्या व्यवसाय इ. |

२) **योजनेचे नांव** :- शासन परिपत्रक क्र. - न्यायाप्र/२०११/प्र.क्र/सुधार - ३ यानुसार महानगरपालिकेमधील आस्थापनेवरील वर्ग ३ व ४ यामध्ये काम करीत असलेल्या व भविष्यात आस्थापनेवर रुजू होणाऱ्या अपंग कर्मचाऱ्यांना त्यांच्या सोयीनुसार लागणारे साहित्य/उपकरणे वाटप

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) मनपा आस्थापनेवर वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये अपंग व्यक्ती कार्यरत असावी.
२) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला
**३)** महानगरपालिकेमध्ये आस्थापनावरील कर्मचारी असल्याचे नेमणूक पत्र.
**४)** आधार कार्डची छायांकित प्रत.

**३) अंपग व्यक्तींना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण :-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | अपंग व्यक्तींना त्यांच्या सोईनुसार प्रशिक्षण देवून त्यांना कार्यक्षम बनविणे. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षे वास्तव असल्याचा दाखला.<br>२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला<br>३) जन्म दाखला.<br>४) शिधापत्रकाची सत्यपत्र<br>५) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र.<br>६) आधार कार्डची छायांकित प्रत. |

४) **अपंग व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरविणे -**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | अपंग व्यक्तींना त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिव्यंग, कर्णबधीर, अंध व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरवून त्यांना स्वावलंबी बनविणे. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षे वास्तव असल्याचा दाखला.<br>२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला<br>३) जन्म दाखला.<br>४) शिधापत्रकाची सत्यपत्र<br>५) आधार कार्डची छायांकित प्रत<br>६) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र. |

**५) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अपंग विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.**

**शिष्यवृत्ती :-**

| शिक्षण | सध्या देण्यात येणारी शिष्यवृत्ती | नव्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिष्यवृत्ती |
|---|---|---|
| १ ते ४ | २५०० | प्रति माह रु.१०००/- प्रमाणे रु.१२,०००/- वार्षिक |
| ५ ते ७ | ४००० | प्रति माह रु.१५००/- प्रमाणे रु.१८,०००/- वार्षिक |
| ८ ते १० | ६००० | प्रति माह रु.१५००/- प्रमाणे रु.१८,०००/- वार्षिक |
| ११ ते १२ | ८००० | प्रति माह रु.२०००/- प्रमाणे रु.२४,०००/- वार्षिक |
| १२ ते पदवी | १०,००० | प्रति माह रु.२०००/- प्रमाणे रु.२४,०००/- वार्षिक |

**योजनेच्या अटीशर्ती :-**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ३ वर्षाचे वास्तव्याचा दाखला पाहिजे.
२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला.
३) जन्म दाखला.
४) शिधापत्रकेची सत्यप्रत.
५) अर्जदाराने मागील शैक्षणिक वर्षात शिक्षण पूर्ण केलेले असावे, सोबत मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. किंवा नविन प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश अर्जाची सत्यप्रत जोडावी.

६) शैक्षणिक फी संबधी मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/कॉलेजमध्ये शिक्षण घेत असल्याचे प्रमाणपत्र जोडावे.
७) अर्जा सोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.
८) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजुर करण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.
९) बॅक पासबुकची छायांकित प्रत.
१०) आधार कार्डची छायांकित प्रत.

**६) अंध व अपंग व्यक्तीला वैद्यकीय उपचाराकरीता वैद्यकीय विमा –**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना वैद्यकीय उपचाराकरीता आर्थिक मदत म्हणुन रु.२,००,०००/- पर्यंत वैद्यकीय विमा काढणे. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला<br>२) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र.<br>३) घर/सदनिका मालक असल्यास १ वर्षापुर्वीचा रहिवास पुरावा<br>४) भाडेकरु असल्यास ३ वर्षापुर्वीचा रहिवास पुरावा.<br>५) आधारकार्डची छायांकित प्रत.<br>६) वैद्यकीय उपचाराकरीता महानगरपालिकेमार्फत मेडीक्लेम पॉलीसी घेवुन १०० % मेडीक्लेमची रक्कम महापालिका भरणा करेल |

**७) अपंग व्यक्तींना रोजगारासाठी व बिजभांडवलासाठी आर्थिक मदत करणे. –**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीजभांडवल उपलब्ध करुन देणे या योजने अंतर्गत जे अपंग लाभार्थी छोटया उदयोजकातील स्वयंरोजगार करण्यासाठी मान्यता प्राप्त बँकेकडुन प्रकल्प खर्चाची मर्यादा रु.३,००,०००/- पर्यंत कर्ज पुरवठा घेतल्यास रु.१,००,०००/- रक्कम हि अनुदान म्हणुन देण्यात येईल. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला<br>२) मान्यता प्राप्त बँकेकडुन कर्ज मंजुर केलेले पत्र.<br>३) रहिवास दाखला (किमान सात वर्ष)<br>४) आधार कार्डची छायांकित प्रत. |

**८) अपंग व्यक्तींना उदरनिवार्ह साठी व्यवसायाकरीता साहित्य खरेदीसाठी अनुदान –**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेले साहित्य साठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. (प्रति लाभार्थी रु.२०,०००/- प्रमाणे) |
| **साहित्य :-** | शिलाई मशिन (मोटारसहित), घरघंटी मशिन, डिपफ्रिजर, सॉफ्टी आईस्क्रीम मशिन, शितपेय ठेवण्यासाठीचे फ्रिज इ. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला<br>२) रहिवास दाखला (किमान सात वर्ष)<br>३) आधार कार्डची छायांकित प्रत.<br>४) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र.<br>५) शिधापत्रिकेची छायांकित प्रत |

**९) अपंगांच्या क्रीडा, चित्रकला, हस्तकला इ. स्पर्धा आयोजित करणे.**

**१०) अपंगाच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे :-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणा-या अपंग व अव्यंग विवाहितांना लग्नासाठी रु.५०,०००/- अर्थसहाय्य करणेबाबत. |

| | |
|---|---|
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) वधू अथवा वराकडे अपंग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असावे.<br>२) अपंग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.<br>३) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी.<br>४) विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.<br>५) विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत समाजकल्याण अधिकारी यांचेडकडे अर्ज करणे आवश्यक आहे.<br>६) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र.<br>७) शिधापत्रिकेची छायांकित प्रत.<br>८) आधारकार्डची छायांकित प्रत. |

**११) अपंग व्यक्तींना आर्थिक मदत.:-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात येईल. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** | १) ४०% व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला<br>२) रहिवास दाखला (किमान सात वर्ष)<br>३) आधार कार्डची छायांकित प्रत.<br>४) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र.<br>५) शिधापत्रिकेची छायांकित प्रत<br>६) बँक खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) सदर योजनेचा लाभ ५० वर्षाच्या वरील तसेच अपंगत्व ७०% च्या वर असल्यास रु.२०००/- प्रती महिना लाभ देण्यात येईल.<br>२) सदर योजनेचा लाभ ५० वर्षाच्या आतील तसेच अपंगत्व ४०% ते ७०% च्या वर असल्यास रु.१५००/- प्रती महिना लाभ देण्यात येईल.<br>३) मतिमंद मुलांना रु.२०००/- प्रती महिना लाभ देण्यात येईल. |

**१२) मतिमंद मुलांसाठी शाळा:-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात येईल. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजना राबविणेसाठी आवश्यक अधिकारी तसेच कर्मचारी** | सदर योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या अपंग मतिमंद मुलांसाठी शाळा सुरु करावयाची असुन असुन सदर शाळेसाठी खालीलप्रमाणे अधिकारी तसेच कर्मचारी आवश्यक आहेत.<br>१) मनोचिकित्सक - आवश्यकतेनुसार<br>२) शिक्षक - आवश्यकतेनुसार<br>३) लिपिक - आवश्यकतेनुसार<br>४) अपंग मुलांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक – आवश्यकतेनुसार<br>५) शिपाई - आवश्यकतेनुसार |

**१३) अपंग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे:-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या अपंग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| | अपंग व्यक्तींची नोंदणी करण्यासाठी सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत. |

**ठराव :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील अपंग कल्याण योजना धोरण निश्चित व मतिमंद विद्यार्थ्यांकरीता शाळा सुरु करणेबाबत धोरण ठरविणे व निर्णय घेणेकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | अध्यक्ष |
| २. | मा. उप-महापौर, | सदस्य |
| ३. | मा. स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | मा. सभागृह नेते, | सदस्य |
| ५. | संबंधीत खात्याचे विभागप्रमुख | सदस्यसचिव |

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी.

तरी वरील समितीने शिफारस केलेल्या निर्णयानूसार अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २८, **महानगरपालिका क्षेत्रात गटई कामगारांना स्टॉल देण्याचे धोरण ठरविणेबाबत**.

**दिपीका अरोरा :-**

**प्रस्ताव :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत परवाना विभागाकडून, महापालिकाक्षेत्रात रस्ते/ गटारावर आतापर्यंत एकूण-५१ गटई स्टॉल परवाने देण्यात आले आहेत.

त्यापैंकी काही परवाना धारकांनी नुतनीकरण केले नाही, काही स्टॉलचे स्थलांतर झाले, काही परवाना धारकांचे निधन झाले. तसेच गटई स्टॉलबाबत अनुज्ञेय परवानगी व्यतिरिक्त वेगळा वापर चालु आहे, स्टॉल स्थलांतर केले आहे, काही परवाने २५० मी. चे आत आहे. जे अटीशर्तीचे विसंगत आहे. काही भागात अनेक गटई स्टॉल परवाने आहेत तर काही ठिकाणी नगण्य आहे.

काही गटई स्टॉल धारक यांनी कर आकारणी केली आहे, काही गटई स्टॉल रस्ता रुंदीकरणात तोडले गेले तर काही गटई स्टॉल रस्ता रुंदीकरणात तोडल्याने वाद चालु आहे स्टॉल परवाना देणेबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे तसेच यापुर्वीच्या अटी-शर्ती कायम ठेऊन रहदारी व स्थानिक परिस्थितीचा विचार करुन निर्णय घेणे उचीत वाटते व त्यानुसार खालील सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत.

- प्रभाग निहाय गटई स्टॉलची संख्या, जागा निश्चिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करणे व त्यानुसार सर्व प्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे, त्यांना स्टॉल देणे व उर्वरित गटई स्टॉल परवान्यांसाठी उपलब्ध जागेनूसार नविन अर्ज स्विकारणे.
- एकदा जागा निश्चित झालेनंतर त्याच जागेवर स्टॉल परवाना देण्यात येईल.
- स्टॉल परवानाकरीता अर्ज जास्त असतीलतर लॉटरी पद्धतीने परवाना दिला जाईल व उर्वरीत स्टॉल अर्जदारांना प्रतिक्षा यादीत ठेवले जाईल.
- आरे सरीता/ महानंदा दुध स्टॉल यांना नव्याने परवाने न देता दिलेल्या स्टॉलचे फक्त नुतनीकरण करता येईल.
- प्रभाग अधिकारी व वाहतूक पोलिस निरीक्षक यांचे स्टॉल संबंधी जागेच्या सकारात्मक अभिप्रायानुसार स्टॉल परवाने दिले जातील.
- प्रभाग निहाय जागा निश्चिती झालेनंतर, दर वर्षानी त्याबाबत आढावाघेणे.
- २५० मी. चे आत स्टॉल असल्यास प्रथम ज्यास परवानगी दिली तो स्टॉल ठेवून अन्य स्टॉल योग्य ठिकाणी स्थलांतरित करणे.
- रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना करणे.
- सर्व गटई स्टॉलला भोगवटा धारक म्हणून कर आकारणी करणे.

- अनुज्ञेय व्यवसाया व्यतिरिक्त अन्य वापर चालु असल्यास, गटई स्टॉल परवाना रद्द करुन गुन्हा दाखल करण्यात येईल.
- मा. महासभा ठराव ३४ मधील अटिशर्तीं नुसार ३X४ चौ. फुटावरच गटई स्टॉल परवाना देण्यात येईल. ३X४ चौ. फुटापेक्षा जास्त जागा अडवल्यास परवाना अटीशर्तीचा भंग केल्याचे कारण दाखवून गटई स्टॉल परवाना रद्द करुन गुन्हा दाखल करण्यात येईल.
- स्टॉलधारकाने नुतनीकरण करताना मागील ५ वर्षात त्याने नियम/अटीचा भंग केला नाही, असे प्रमाणपत्र संबंधित WO /JE (बांधकाम) यांनी सादर करणे बंधनकारक राहील.
- स्टॉल फक्त अंपग व गटई स्टॉल धारकासाठी असावेत. स्टॉलचा वापर योग्य रितीने व नियम व अटीशर्तींप्रमाणे होत असल्याची तपासणी दरवर्षी WO /JE(बांधकाम) मार्फत होईल. दर ५ वर्षानंतर नुतनीकरण होईल. नुतनीकरण करताना मागील ५ वर्षाचा तपासणी अहवाल तपासून नुतनीकरण करुन देण्यात येईल.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत ११६ गटई स्टॉल धारकांचे अर्ज प्राप्त झाले असून नागरीक गटई स्टॉल मिळणेकामी दररोज तक्रारी करत असतात. तसेच आरे सरीता/ महानंदा दुध स्टॉल यांना नव्याने परवाने न देता दिलेल्या स्टॉलचे फक्त नुतनीकरण करता येईल.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील गटई कामगारांना स्टॉल देण्याचे धोरण ठरविणे व निर्णय घेणेकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | अध्यक्ष |
| २. | मा. उप-महापौर, | सदस्य |
| ३. | मा. स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | मा. सभागृह नेते, | सदस्य |
| ५. | संबंधीत खात्याचे विभागप्रमुख | सदस्यसचिव |

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी.
तरी वरील समितीने शिफारस केलेल्या निर्णयानूसार अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे.

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. २८ :-**

**महानगरपालिका क्षेत्रात गटई कामगारांना स्टॉल देण्याचे धोरण ठरविणेबाबत**.

**ठराव क्र. २५ :-**

**प्रस्ताव :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत परवाना विभागाकडून, महापालिकाक्षेत्रात रस्ते/ गटारावर आतापर्यंत एकूण-५१ गटई स्टॉल परवाने देण्यात आले आहेत.

त्यापैंकी काही परवाना धारकांनी नुतनीकरण केले नाही, काही स्टॉलचे स्थलांतर झाले, काही परवाना धारकांचे निधन झाले. तसेच गटई स्टॉलबाबत अनुज्ञेय परवानगी व्यतिरिक्त वेगळा वापर चालु आहे, स्टॉल स्थलांतर केले आहे, काही परवाने २५० मी. चे आत आहे. जे अटीशर्तीचे विसंगत आहे. काही भागात अनेक गटई स्टॉल परवाने आहेत तर काही ठिकाणी नगण्य आहे.

काही गटई स्टॉल धारक यांनी कर आकारणी केली आहे, काही गटई स्टॉल रस्ता रुंदीकरणात तोडले गेले तर काही गटई स्टॉल रस्ता रुंदीकरणात तोडल्याने वाद चालु आहे स्टॉल परवाना देणेबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे तसेच यापुर्वीच्या अटी-शर्ती कायम ठेऊन रहदारी व स्थानिक परिस्थितीचा विचार करुन निर्णय घेणे उचीत वाटते व त्यानुसार खालील सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत.

- प्रभाग निहाय गटई स्टॉलची संख्या, जागा निश्चिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करणे व त्यानुसार सर्व प्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे, त्यांना स्टॉल देणे व उर्वरित गटई स्टॉल परवान्यांसाठी उपलब्ध जागेनूसार नविन अर्ज स्विकारणे.
- एकदा जागा निश्चित झालेनंतर त्याच जागेवर स्टॉल परवाना देण्यात येईल.
- स्टॉल परवानाकरीता अर्ज जास्त असतीलतर लॉटरी पद्धतीने परवाना दिला जाईल व उर्वरीत स्टॉल अर्जदारांना प्रतिक्षा यादीत ठेवले जाईल.
- आरे सरीता/ महानंदा दुध स्टॉल यांना नव्याने परवाने न देता दिलेल्या स्टॉलचे फक्त नुतनीकरण करता येईल.

- प्रभाग अधिकारी व वाहतूक पोलिस निरीक्षक यांचे स्टॉल संबंधी जागेच्या सकारात्मक अभिप्रायानुसार स्टॉल परवाने दिले जातील.
- प्रभाग निहाय जागा निश्चिती झालेनंतर, दर वर्षानी त्याबाबत आढावाघेणे.
- २५० मी. चे आत स्टॉल असल्यास प्रथम ज्यास परवानगी दिली तो स्टॉल ठेवून अन्य स्टॉल योग्य ठिकाणी स्थलांतरित करणे.
- रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना करणे.
- सर्व गटई स्टॉलला भोगवटा धारक म्हणून कर आकारणी करणे.
- अनुज्ञेय व्यवसाया व्यतिरिक्त अन्य वापर चालु असल्यास, गटई स्टॉल परवाना रद्द करुन गुन्हा दाखल करण्यात येईल.
- मा. महासभा ठराव ३४ मधील अटिशर्ती नुसार ३X४ चौ. फुटावरच गटई स्टॉल परवाना देण्यात येईल. ३X४ चौ. फुटापेक्षा जास्त जागा अडवल्यास परवाना अटीशर्तीचा भंग केल्याचे कारण दाखवून गटई स्टॉल परवाना रद्द करुन गुन्हा दाखल करण्यात येईल.
- स्टॉलधारकाने नुतनीकरण करताना मागील ५ वर्षात त्याने नियम/अटीचा भंग केला नाही, असे प्रमाणपत्र संबंधित WO /JE (बांधकाम) यांनी सादर करणे बंधनकारक राहील.
- स्टॉल फक्त अंपग व गटई स्टॉल धारकासाठी असावेत. स्टॉलचा वापर योग्य रितीने व नियम व अटीशर्तीप्रमाणे होत असल्याची तपासणी दरवर्षी WO /JE(बांधकाम) मार्फत होईल. दर ५ वर्षानंतर नुतनीकरण होईल. नुतनीकरण करताना मागील ५ वर्षाचा तपासणी अहवाल तपासून नुतनीकरण करुन देण्यात येईल.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत ११६ गटई स्टॉल धारकांचे अर्ज प्राप्त झाले असून नागरीक गटई स्टॉल मिळणेकामी दररोज तक्रारी करत असतात. तसेच आरे सरीता/ महानंदा दुध स्टॉल यांना नव्याने परवाने न देता दिलेल्या स्टॉलचे फक्त नुतनीकरण करता येईल.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील गटई कामगारांना स्टॉल देण्याचे धोरण ठरविणे व निर्णय घेणेकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | अध्यक्ष |
| २. | मा. उप-महापौर, | सदस्य |
| ३. | मा. स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | मा. सभागृह नेते, | सदस्य |
| ५. | संबंधीत खात्याचे विभागप्रमुख | सदस्यसचिव |

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी.
तरी वरील समितीने शिफारस केलेल्या निर्णयानूसार अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. दिपीका अरोरा अनुमोदक :- श्री. मनोज दुबे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २९, **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण** २ **चे कलम** २५(२) **अन्वये परिवहन समितीवर पालिका सदस्य अथवा बाहेरील व्यक्तींमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून** १२ **व्यक्तींची नेमणूक करणे**.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम स्थापन करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २ चे कलम २५(२) अन्वये परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे तरतूद आहे.

कलम २५(२)**–**महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केल्यानंतर आपल्या पहिल्या सभेत महानगरपालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिका, औद्योगिक,

वाणिज्यीक, वित्तीय किंवा कामगाराविषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे पालिका सदस्य असतील वा नसतील अशा व्यकतीमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून **बारा** व्यक्तींची नेमणूक केली पाहिजे.

**ठराव :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार परिवहन समितीवर **बारा** सदस्यांची नेमणूक करणेबाबत आयुक्तांनी परिवहन सेवा समिती गठीत करणेची कायदेशीर कार्यवाही सुरु करावी असा मी ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

अधिनियम वाचा.

**मा. उपमहापौर :-**

जागेवर बसा. तशी प्रोव्हिजन आहे त्याशिवाय वाचणार नाहीत. जागेवर बसा मग तुमचे ऐकून झाल्यावर परत या. हे आमच्यासाठी नाही हे तुमच्यासाठी आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्र. नगरसचिव :-**

अधिनियम वाचन केले. १९४९ मधील १ अ अ १९-१ अ सभागृह नेत्याचे स्पष्टीकरण.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम ह्या ठिकाणी विरोधी पक्षनेत्याचे एकच नाव आलेले आहे. मा. महापौर मॅडम अधिकार कोणाला आहे.

**मा. उपमहापौर :-**

पक्षाचा नेता म्हणून आपली नोंद जी कोकण भवनला झालेली आहे...............

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम तुम्हाला एकच नाव आलेले आहे. ते डिक्लेयर करायचे आहे. याच्यासाठी कोणाकडे जाण्याची गरज नाही.

**मा. महापौर :-**

तो महापौरांना व्यक्तिगत अधिकार आहे.

(सभागृहात गोंधळ)

**दिप्ती भट्ट :-**

व्यक्तीगत म्हणजे काय पण करणार का?

**प्रकरण क्र. २९ :-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण** २ **चे कलम** २५(२) **अन्वये परिवहन समितीवर पालिका सदस्य अथवा बाहेरील व्यक्तींमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून** १२ **व्यक्तींची नेमणूक करणे**.

**ठराव क्र. २६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम स्थापन करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २ चे कलम २५(२) अन्वये परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे तरतूद आहे.

कलम २५(२)**-**महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केल्यानंतर आपल्या पहिल्या सभेत महानगरपालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिका, औद्योगिक, वाणिज्यीक, वित्तीय किंवा कामगाराविषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे पालिका सदस्य असतील वा नसतील अशा व्यकतीमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून **बारा** व्यक्तींची नेमणूक केली पाहिजे.

**ठराव :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार परिवहन समितीवर **बारा** सदस्यांची नेमणूक करणेबाबत आयुक्तांनी परिवहन सेवा समिती गठीत करणेची कायदेशीर कार्यवाही सुरु करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३०, **महापौर चषक** २०१७ **आयोजित करणेसाठी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत**.

**वर्षा भानुशाली :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रीडा विभागा अंतर्गत 'महापौर चषक २०१७-१८' चे आयोजन करावयाचे असुन त्यासाठी खालीलप्रमाणे सांस्कृतिक कला क्रिडा स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.

| **अ.क्र.** | **खेळाचे नाव** | **वयोगट** | | | | | **स्पर्धेचे ठिकाण** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मैदानी स्पर्धा | **१०** वर्षाखालील मुले/मुली | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | सुभाषचंद्र बोस मैदान |
| २ | खो-खो | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | सचिन तेडुंलकर मैदान, भाईंदर (पु) |
| ३ | कबड्डी | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | सचिन तेडुंलकर मैदान, भाईंदर (पु) |
| ४ | सिझन बॉल क्रिकेट | - | - | - | **१९** वर्षाखालील मुले | - | सुभाषचंद्र बोस मैदान |
| ५ | टेनिस बॉल क्रिकेट | - | - | - | - | निमंत्रित | सुभाषचंद्र बोस मैदान |
| ६ | फुटबॉल | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | सुभाषचंद्र बोस मैदान |
| ७ | बुध्दीबळ | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| ८ | कॅरम | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| ९ | व्हॉलीबॉल | - | - | १७ वर्षाखालील मुले | १९ वर्षाखालील मुले | निमंत्रित | जेसलपार्क चौपाटी |
| १० | थ्रो बॉल | - | - | १७ वर्षाखालील मुली | १९ वर्षाखालील मुली | - | जेसलपार्क चौपाटी |
| ११ | लंगडी | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | - | - | सुभाषच्रदं बोस मैदान |
| १२ | बॅडमिंटन | - | - | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| १३ | कॅरम स्पर्धा | - | - | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | वरिष्ठ् नागरीक | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| १४ | वैयक्तिक नृत्य् | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | रिना मेहता कॉलेज |
| १५ | सांघीक नृत्य् | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | रिना मेहता कॉलेज |
| १६ | चित्रकला | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | - | - | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | भवन, (नगरभवन) |
| १७ | रांगोळी स्पर्धा | - | - | - | - | फक्त् महिलांकरीता | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, (नगरभवन) |
| १८ | कुस्ती स्पर्धा | - | **१४** वर्षाखालील मुले | **१७** वर्षाखालील मुले | - | - | गणेश आखाडा भाईंदर (प.) |

**ठराव :-**

महापौर चषक २०१७-१८ या सांस्कृतिक व कला क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्राकामध्ये रु.७५ लाखांची तरतुद करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सदर लेखाशिर्षा अंतर्गत रु.५१ लाख इतकी तरतुद शिल्ल्क आहे. तरी “महापौर चषक २०१७-१८” चे आयोजन करणेकरीता इवेंट मॅनेजमेंट संस्थेमार्फत निविदा मागविण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. खेळ व स्पर्धेच्या वाढीव खर्चास पुर्नःविनीयोजनाचे अधिकार आयुक्त यांना देणेस ही महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ३० :-**

**महापौर चषक** २०१७ **आयोजित करणेसाठी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत**.

**ठराव क्र. २७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रीडा विभागा अंतर्गत 'महापौर चषक २०१७-१८' चे आयोजन करावयाचे असुन त्यासाठी खालीलप्रमाणे सांस्कृतिक कला क्रिडा स्पर्धाचे आयोजन करावयाचे आहे.

| अ.क्र. | खेळाचे नाव | वयोगट | | | | | स्पर्धेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मैदानी स्पर्धा | **१०** वर्षाखालील मुले/मुली | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | सुभाषचंद्र बोस मैदान |
| २ | खो-खो | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | सचिन तेडुंलकर मैदान, भाईंदर (पु) |
| ३ | कबड्डी | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | सचिन तेडुंलकर मैदान, भाईंदर (पु) |
| ४ | सिझन बॉल क्रिकेट | - | - | - | **१९** वर्षाखालील मुले | - | सुभाषचंद्र बोस मैदान |
| ५ | टेनिस बॉल क्रिकेट | - | - | - | - | निमंत्रित | सुभाषचंद्र बोस मैदान |
| ६ | फुटबॉल | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | सुभाषचंद्र बोस मैदान |
| ७ | बुध्दीबळ | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| ८ | कॅरम | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | व्हॉलीबॉल | - | - | १७ वर्षाखालील मुले | १९ वर्षाखालील मुले | निमंत्रित | जेसलपार्क चौपाटी |
| १० | थ्रो बॉल | - | - | १७ वर्षाखालील मुली | १९ वर्षाखालील मुली | - | जेसलपार्क चौपाटी |
| ११ | लंगडी | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | - | - | सुभाषच्रदं बोस मैदान |
| १२ | बॅडमिंटन | - | - | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| १३ | कॅरम स्पर्धा | - | - | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | वरिष्ठ् नागरीक | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| १४ | वैयक्तिक नृत्य् | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | रिना मेहता कॉलेज |
| १५ | सांघीक नृत्य् | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | **१९** वर्षाखालील मुले/मुली | - | रिना मेहता कॉलेज |
| १६ | चित्रकला | - | **१४** वर्षाखालील मुले/मुली | **१७** वर्षाखालील मुले/मुली | - | - | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, (नगरभवन) |
| १७ | रांगोळी स्पर्धा | - | - | - | - | फक्त् महिलांकरीता | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, (नगरभवन) |
| १८ | कुस्ती स्पर्धा | - | **१४** वर्षाखालील मुले | **१७** वर्षाखालील मुले | - | - | गणेश आखाडा भाईंदर (प.) |

**ठराव :-**

महापौर चषक २०१७-१८ या सांस्कृतिक व कला क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्राकामध्ये रु.७५ लाखांची तरतुद करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सदर लेखाशिर्षा अंतर्गत रु.५१ लाख इतकी तरतुद शिल्लक आहे. तरी "महापौर चषक २०१७-१८" चे आयोजन करणेकरीता इवेंट मॅनेजमेंट संस्थेमार्फत निविदा मागविण्यास व येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. खेळ व स्पर्धेच्या वाढीव खर्चास पुर्नःविनीयोजनाचे अधिकार आयुक्त यांना देणेस ही महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. वर्षा भानुशाली** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३१, **दि**. २८ **फेब्रुवारी** २०१८ **रोजी महापालिकेचा वर्धापन दिन साजरा करणेबाबत**.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका दि.१२/०६/१९८५ रोजी स्थापन झाली. तद्नंतर दि.२८/०२/२००२ रोजी नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झाले असून दि.२८/०२/२०१८ रोजी १६ वा वर्धापन दिन साजरा करावयाचा असून सदर खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी तसेच येणा-या खर्चास पुर्नःविनियोजन करणेस ही महासभा मान्यता देत आहे. कार्यक्रमाकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करीत आहेत.

| अ.क्र | नावे | पद |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | अध्यक्ष |
| २. | मा. उप-महापौर, | सदस्य |
| ३. | मा. स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | मा. सभागृह नेते | सदस्य |
| ५. | सर्व पक्षीय गटनेते | सदस्य |
| ६. | संबंधीत खात्याचे विभागप्रमुख | सदस्यसचिव |

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी. तरी वरील समितीने शिफारस केलेल्या निर्णयानूसार अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ३१ :-**

**दि**. २८ **फेब्रुवारी** २०१८ **रोजी महापालिकेचा वर्धापन दिन साजरा करणेबाबत**.

**ठराव क्र. २८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका दि.१२/०६/१९८५ रोजी स्थापन झाली. तद्नंतर दि.२८/०२/२००२ रोजी नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झाले असून दि.२८/०२/२०१८ रोजी १६ वा वर्धापन दिन साजरा करावयाचा असून सदर खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी तसेच येणा-या खर्चास पुर्नःविनियोजन करणेस ही महासभा मान्यता देत आहे. कार्यक्रमाकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करीत आहेत.

| अ.क्र | नावे | पद |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | अध्यक्ष |
| २. | मा. उप-महापौर, | सदस्य |
| ३. | मा. स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | मा. सभागृह नेते | सदस्य |
| ५. | सर्व पक्षीय गटनेते | सदस्य |
| ६. | संबंधीत खात्याचे विभागप्रमुख | सदस्यसचिव |

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी. तरी वरील समितीने शिफारस केलेल्या निर्णयानूसार अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३२, **मिरारोड (पूर्व) नयानगर येथील पोलीस कार्यालयाकरीता रसाज थिएटर जवळील महानगरपालिकेच्या इमारतीत जागा उपलब्ध करुन देणेबाबत**.

**प्रशांत दळवी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) नयानगर येथील पोलिस कार्यालयाची इमारत रस्ता रुंदीकरणात बाधित होत आहे. सदर कार्यालयामार्फत जागा उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे. रसाझ थिएटर समोर महानगरपालिकेची समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकासकाकडुन बांधुन प्राप्त झालेली ४१५.६५ चौ.मीटर क्षेत्राची तळ अधिक एक मजल्याची जागा असुन सदर जागेत क्षयरोग केंद्र आहे.

सदर क्षयरोग केंद्र मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.२३२ या जागेत विकासकाकडुन समावेशक आरक्षणातुन बांधुन हस्तांतर झालेल्या ५९२.८० चौ.मीटर क्षेत्राच्या जागेत सदर क्षयरोग केंद्र स्थलांतरीत करता येऊ शकेल.

प्रशासनाचा सदर प्रस्ताव पाहता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

**<u>ठराव</u>**

प्रशासनाचा वरील प्रस्ताव पाहता मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.१८१ या जागेतील क्षयरोग केंद्र, आरोग्य विभाग, वैद्यकिय आरोग्य विभागाची इतर कार्यालये ही आरक्षण क्र.२३२ या जागेत स्थलांतरीत करण्यात

यावीत. तसेच आरक्षण क्र. १८१ ही जागा रिकामी करुन सदर जागेचे नाममात्र भाडे आकारुन नयानगर पोलिस स्टेशनसाठी तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यासाठी देण्यात यावी. सदर जागेचा ताबा दिल्यानंतर नयानगर रस्त्यावरच्या चौकीचे बांधकाम पाडण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**सिमा शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ३२ :-**

**मिरारोड (पूर्व) नयानगर येथील पोलीस कार्यालयाकरीता रसाज थिएटर जवळील महानगरपालिकेच्या इमारतीत जागा उपलब्ध करुन देणेबाबत**.

**ठराव क्र. २९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) नयानगर येथील पोलिस कार्यालयाची इमारत रस्ता रुंदीकरणात बाधित होत आहे. सदर कार्यालयामार्फत जागा उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे. रसाझ थिएटर समोर महानगरपालिकेची समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकासकाकडुन बांधुन प्राप्त झालेली ४१५.६५ चौ.मीटर क्षेत्राची तळ अधिक एक मजल्याची जागा असुन सदर जागेत क्षयरोग केंद्र आहे.

सदर क्षयरोग केंद्र मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.२३२ या जागेत विकासकाकडुन समावेशक आरक्षणातुन बांधुन हस्तांतर झालेल्या ५९२.८० चौ.मीटर क्षेत्राच्या जागेत सदर क्षयरोग केंद्र स्थलांतरीत करता येऊ शकेल.

प्रशासनाचा सदर प्रस्ताव पाहता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

<u>ठराव</u>

प्रशासनाचा वरील प्रस्ताव पाहता मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.१८१ या जागेतील क्षयरोग केंद्र, आरोग्य विभाग, वैद्यकिय आरोग्य विभागाची इतर कार्यालये ही आरक्षण क्र.२३२ या जागेत स्थलांतरीत करण्यात यावीत. तसेच आरक्षण क्र. १८१ ही जागा रिकामी करुन सदर जागेचे नाममात्र भाडे आकारुन नयानगर पोलिस स्टेशनसाठी तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यासाठी देण्यात यावी. सदर जागेचा ताबा दिल्यानंतर नयानगर रस्त्यावरच्या चौकीचे बांधकाम पाडण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी　　　अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३३, **महानगरपालिकेस असलेले आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार मा. स्थायी समितीस प्रदान करणेबाबत**.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महासभा दि. ०५/०५/२००५ ठराव क्र. ११ अन्वये रु.५०.०० लक्ष पर्यतच्या खर्चाचे प्रशासकीय व आर्थीक मान्यतेचे अधिकार मा. स्थायी समितीस प्रदान करण्यात आलेले आहेत. सदर ठरावास १२ वर्ष उलटुन गेलेली असुन प्रशासकीय कामात गती येण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियम कलम ६७ (२) ७२ व ७३ च्या तरतुदीनुसार रु. २.०० कोटी रकमेच्या कामांचे आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार मा. स्थायी समितीस प्रदान करणेस ही महासभा मंजूरी देत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम सभागृहाचा अपमान होत आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ३३ :-**

**महानगरपालिकेस असलेले आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार मा. स्थायी समितीस प्रदान करणेबाबत**.

**ठराव क्र. ३० :-**

मा. महासभा दि. ०५/०५/२००५ ठराव क्र. ११ अन्वये रु.५०.०० लक्ष पर्यतच्या खर्चाचे प्रशासकीय व आर्थीक मान्यतेचे अधिकार मा. स्थायी समितीस प्रदान करण्यात आलेले आहेत. सदर ठरावास १२ वर्ष उलटुन

गेलेली असुन प्रशासकीय कामात गती येण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियम कलम ६७ (२) ७२ व ७३ च्या तरतुदीनुसार रु. २.०० कोटी रकमेच्या कामांचे आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार मा. स्थायी समितीस प्रदान करणेस ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३४, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात हिंदू हृद्यसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे कला दालन/सांस्कृतिक भवन उभारणेबाबत**.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**मा. महासभा दि.19/05/2017 मध्ये खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.**

" मरा-भाईंदर महानगरपा लका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) मौजे गोडदेव येथील आरक्षण क्र. १२२ या खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरणासाठी राखीव असलेल्या जागेवर हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणेस व मिरारोड (पुर्व) मौजे नवघर या खेळाच्या मैदानाच्या राखीव असलेल्या जागेवर स्वर्गीय प्रमोदन महाजन यांचे स्मारक उभारण्यासाठी मा. विशेष महासभा दि.०५/०७/२०१६, ठराव क्र. ३० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने ई-निविदा प्रक्रियेव्दारे निविदा मागवून मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेने मे. एन.डी. आर्ट वर्ल्ड प्रा.लि. (श्री. नितीन देसाई) यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सल्लागारामार्फत दोन्ही प्रकल्पासाठी आरक्षणाच्या अनुज्ञेय क्षेत्रात स्मारकाऐवजी सांस्कृतिक भवन, कला दालन उभारण्यासाठी आराखडे व नकाशे सादर करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकल्पासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१) <u>हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे कला दालन / सांस्कृतिक भवन</u>

टप्पा क्र. १ रू.४,९१,७५,०००/-
टप्पा क्र. २ रू.४,९०,०७,५००/-
टप्पा क्र. ३ रू.५,७१,५०,०००/-
टप्पा क्र. ४ रू.४,२३,७०,०००/-
टप्पा क्र. ५ रू.५,१०,००,०००/-
<u>एकूण अंदाजित खर्च रू.२४,८७,०२,५००/-</u>

२) <u>स्वर्गीय प्रमोद महाजन कला दालन / सांस्कृतिक भवन</u>

टप्पा क्र. १ रू.४,९८,६२,५००/-
टप्पा क्र. २ रू.४,८४,१८,५००/-
टप्पा क्र. ३ रू.४,६४,७५,०००/-
टप्पा क्र. ४ रू.८,८८,१२,५००/-
<u>एकूण अंदाजित खर्च रू.२२,३५,६८,५००/-</u>

वरील दोन्ही प्रकल्पासाठी मोठ्या स्वरूपात खर्च होणार असल्याने अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार निविदा प्रक्रिया करण्यासाठी कामाचे टप्पे करण्यात आलेले आहेत. सदर दोन्ही प्रकल्पासाठी सन २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तरतूद करावी लागणार आहे. सदर प्रकल्पासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देण्यासाठीदेखील मागणी करण्यात आलेली आहे.

**आरक्षण क्र. 122 हे आरक्षण खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या संयुक्त हेतूसाठी आरक्षित असून मंजूर विकास योजनेमध्ये एकत्रित क्षेत्र दर्शविलेले आहे . मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. 9 (vii) प्रमाणे खेळाचे मैदान या एकूण क्षेत्राच्या 15% प्रमाणे (10% तळ मजला व 5% पहिला मजला) बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय होवू शकते. तथापी आरक्षण क्र. 122 (खेळाचे मैदान व सामाजिक**

**वनीकरण) साठीच्या एकूण 46700 चौ.मी. क्षेत्राची खेळाच्या मैदानासाठी स्वतंत्र क्षेत्र नमूद केलेले नाही . तसेच स्मारक उभारणेसाठीची तरतुद व सामाजिक वनीकणामध्ये अनुज्ञेय होणाऱ्या क्षेत्राच्या किंवा अनुज्ञेय बांधकामाचा उल्लेख मंजूर विकास नियंत्रण नि यमावलीमध्ये अंतर्भुत नाही .मंजूर विकास नियंत्रण नियिमावलीतील तरतूद 10(3) नूसार मिश्र वापराकरीता शासनाची पूर्व मंजूरी आवश्यक आहे . सदर आरक्षण क्र. 122 खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या आरक्षामध्ये आरक्षणाच्या चार ही बाजूस विविध स्वरूपाची झाडांची लागवड करून आती ल जागेमध्ये** हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे **यांचे** कला दालन / सांस्कृतिक भवन उभारणेसाठी व 15% **मर्यादेत बांधकाम अनुज्ञेय करणेसाठी शासनाची पूर्व मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव नगररचना विभागामार्फत स्वतंत्ररित्या मा . महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.**

**भाईंदर (पूर्व)** आरक्षण क्र. १२२ या जागेवर असलेले अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे तसेच पात्र बांधकामे यांचे सर्व्हेक्षण करण्यात येत असून सदर आरक्षणाची जागा मोकळी करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. सदर आरक्षणातील पात्र लाभार्थ्यांचे पुर्नवसन करणे, पर्यायी जागा उपलब्ध करून देणे कायदेशिर मार्गाचा अवलंब करून बांधकामे काढून टाकणे इत्यादी कार्यवाही करावी लागणार आहे."

तथापी मा. महासभा दि.19/05/2017 ठराव क्र.06 अन्वये "अ" प्रस्तावास शासनाकडे पाठविणेस मान्यता देण्याची आवश्यकता असताना मा. महासभेने मान्यता दिलेली नाही. सदर मान्यता दिल्यास शासनाकडे प्रस्ताव पाठवून मान्यता मिळाल्यानंतर शासनाकडे पाठपुरावा करुन अनुदान उपलब्ध झाल्यानंतर सदर प्रकल्पाबाबत पुढील कार्यवाही करता येईल. सद्यास्थितीत सन 2017-18 या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.4.00 कोटी एवढीच तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच मैदान व सामाजिक वनीकरण या आरक्षणात विहीत चटईक्षेत्राच्या मर्यादेत कलादालन व सांस्कृतिक भवन बांधण्याचे काम अनुज्ञेय करण्यासाठी देखिल शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे. दरम्यानच्या काळात सदर आरक्षणाच्या जागेवरील बांधकामे काढण्याबाबत देखिल कार्यवाही करण्यात येईल. **शासनाच्या मान्यतेनंतर प्रत्यक्ष जागेवरील बांधकामे काढून अर्थसंकल्पीय तरतुद व शासनाकडून अनुदान उपलब्धतेची हमी मिळाल्यानंतर निविदा मागविण्याची प्रक्रीया करणेस योग्य होईल .** तरी प्रस्तावित केल्यानुसार आवश्यक मंजुरीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता **देणेसाठी प्रशासनाने प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्ताव पाहता** खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

<u>ठराव :-</u>

**आरक्षण क्र. 122 या जागेत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे असून सदर बांधकामे काढून जागा रिकामी करण्यात या वी, तद्नंतर प्रशासनाच्या प्रस्तावानूसार शासनाकडून सदर जागेत कलादालन व सांस्कृतिक भवन बांधण्याचे काम अनुज्ञेय करण्यासाठी तसेच मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनूसार मिश्र वापरासाठी परवानगी घेण्यात यावी याकरीता मा . आयुक्त यांना अधिकार देण्यात येत आहेत . तसेच सदर परवानगी प्राप्त झाल्यानंतर व सर्व अतिक्रमणे , अनधिकृत बांधकामे काढून जागा रिकामी झाल्यानंतर सदर विषय महासभेपुढे सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.**

सुरेश खंडेलवाल :-

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ३४ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात हिंदू हृद्यसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे कला दालन/सांस्कृतिक भवन उभारणेबाबत**.

ठराव क्र. ३१ :-

**मा. महासभा दि.19/05/2017 मध्ये खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.**

" मरा-भाईंदर महानगरपा लका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) मौजे गोडदेव येथील आरक्षण क्र. १२२ या खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरणासाठी राखीव असलेल्या जागेवर हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणेस व मिरारोड (पुर्व) मौजे नवघर या खेळाच्या मैदानाच्या राखीव असलेल्या जागेवर स्वर्गीय प्रमोदन महाजन यांचे स्मारक उभारण्यासाठी मा. विशेष महासभा दि.०५/०७/२०१६, ठराव क्र. ३० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने ई-निविदा प्रक्रियेव्दारे निविदा मागवून मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेने मे. एन.डी. आर्ट वर्ल्ड प्रा.लि. (श्री. नितीन देसाई) यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सल्लागारामार्फत दोन्ही प्रकल्पासाठी आरक्षणाच्या अनुज्ञेय क्षेत्रात स्मारकाऐवजी सांस्कृतिक भवन, कला दालन उभारण्यासाठी आराखडे व नकाशे सादर करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकल्पासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१) <u>हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे कला दालन / सांस्कृतिक भवन</u>

टप्पा क्र. १ रू.४,९१,७५,०००/-
टप्पा क्र. २ रू.४,९०,०७,५००/-
टप्पा क्र. ३ रू.५,७१,५०,०००/-
टप्पा क्र. ४ रू.४,२३,७०,०००/-
टप्पा क्र. ५ रू.५,१०,००,०००/-
<u>एकूण अंदाजित खर्च रू.२४,८७,०२,५००/-</u>

२) <u>स्वर्गीय प्रमोद महाजन कला दालन / सांस्कृतिक भवन</u>

टप्पा क्र. १ रू.४,९८,६२,५००/-
टप्पा क्र. २ रू.४,८४,१८,५००/-
टप्पा क्र. ३ रू.४,६४,७५,०००/-
टप्पा क्र. ४ रू.८,८८,१२,५००/-
<u>एकूण अंदाजित खर्च रू.२२,३५,६८,५००/-</u>

वरील दोन्ही प्रकल्पासाठी मोठ्या स्वरूपात खर्च होणार असल्याने अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार निविदा प्रक्रिया करण्यासाठी कामाचे टप्पे करण्यात आलेले आहेत. सदर दोन्ही प्रकल्पासाठी सन २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तरतूद करावी लागणार आहे. सदर प्रकल्पासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देण्यासाठीदेखील मागणी करण्यात आलेली आहे.

**आरक्षण क्र. 122 हे आरक्षण खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या संयुक्त हेतूसाठी आरक्षित असून मंजूर विकास योजनेमध्ये एकत्रित क्षेत्र दर्शविलेले आहे . मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. 9 (vii) प्रमाणे खेळाचे मैदान या एकूण क्षेत्राच्या 15% प्रमाणे (10% तळ मजला व 5% पहिला मजला) बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय होवू शकते. तथापी आरक्षण क्र. 122 (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) साठीच्या एकूण 46700 चौ.मी. क्षेत्राची खेळाच्या मैदानासाठी स्वतंत्र क्षेत्र नमूद केलेले नाही . तसेच स्मारक उभारणेसाठीची तरतुद व सामाजिक वनीकणामध्ये अनुज्ञेय होणाऱ्या क्षेत्राच्या किंवा अनुज्ञेय बांधकामाचा उ ल्लेख मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भुत नाही .मंजूर विकास नियंत्रण नियिमावलीतील तरतूद 10(3) नूसार मिश्र वापराकरीता शासनाची पूर्व मंजूरी आवश्यक आहे . सदर आरक्षण क्र. 122 खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या आरक्षामध्ये आरक्षणाच्या चार ही बाजूस विविध स्व रूपाची झाडांची लागवड करून आतील जागेमध्ये** हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे **यांचे** कला दालन / सांस्कृतिक भवन उभारणेसाठी व 15% **मर्यादेत बांधकाम अनुज्ञेय करणेसाठी शासनाची पूर्व मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव नगररचना विभागामार्फत स्वतंत्ररित्या मा . महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.**

**भाईंदर (पूर्व)** आरक्षण क्र. १२२ या जागेवर असलेले अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे तसेच पात्र बांधकामे यांचे सर्व्हेक्षण करण्यात येत असून सदर आरक्षणाची जागा मोकळी करण्याच्या दृष्टीने आवश्यक

कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. सदर आरक्षणातील पात्र लाभार्थ्यांचे पुर्नवसन करणे, पर्यायी जागा उपलब्ध करून देणे कायदेशिर मार्गाचा अवलंब करून बांधकामे काढून टाकणे इत्यादी कार्यवाही करावी लागणार आहे."

तथापी मा. महासभा दि.19/05/2017 ठराव क्र.06 अन्वये "अ" प्रस्तावास शासनाकडे पाठविणेस मान्यता देण्याची आवश्यकता असताना मा. महासभेने मान्यता दिलेली नाही. सदर मान्यता दिल्यास शासनाकडे प्रस्ताव पाठवून मान्यता मिळाल्यानंतर शासनाकडे पाठपुरावा करुन अनुदान उपलब्ध झाल्यानंतर सदर प्रकल्पाबाबत पुढील कार्यवाही करता येईल. सद्यस्थितीत सन 2017-18 या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.4.00 कोटी एवढीच तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच मैदान व सामाजिक वनीकरण या आरक्षणात विहीत चटईक्षेत्राच्या मर्यादेत कलादालन व सांस्कृतिक भवन बांधण्याचे काम अनुज्ञेय करण्यासाठी देखिल शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे. दरम्यानच्या काळात सदर आरक्षणाच्या जागेवरील बांधकामे काढण्याबाबत देखिल कार्यवाही करण्यात येईल. **शासनाच्या मान्यतेनंतर प्रत्यक्ष जागेवरील बांधकामे काढून अर्थसंकल्पीय तरतुद व शासनाकडून अनुदान उपलब्धतेची हमी मिळाल्यानंतर निविदा मागविण्याची प्रक्रीया करणेस योग्य होईल .** तरी प्रस्तावित केल्यानुसार आवश्यक मंजुरीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता **देणेसाठी प्रशासनाने प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्ताव पाहता** खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

**ठराव :-**

**आरक्षण क्र. 122 या जागेत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे असून सदर बांधकामे काढून जागा रिकामी करण्यात यावी , तद्नंतर प्रशासनाच्या प्रस्तावानूसार शासनाकडून सदर जागेत कलादालन व सांस्कृतिक भवन बांधण्याचे काम अनुज्ञेय करण्यासाठी तसेच मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनूसार मिश्र वापरासाठी परवानगी घेण्यात यावी याकरीता मा . आयुक्त यांना अधिकार देण्यात येत आहेत . तसेच सदर परवानगी प्राप्त झाल्यानंतर व सर्व अतिक्रमणे , अनधिकृत बांधकामे काढून जागा रिकामी झाल्यानंतर सदर विषय महासभेपुढे सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३५, **महानगरपालिका नविन मुख्य कार्यालय इमारत बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे**.

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने यापूर्वी सर्व्हे क्र./हिस्सा क्र.११४/१,२, ११३/१,२,४, जुना ४८१/पै.पै, ४७८/पै.,पै.,पै. याठिकाणी मुख्य कार्यालयाची इमारत बांधणेकामी यापूर्वीच दि.२१/१०/२०१५ ने बांधकाम प्रारंभ पत्र दिलेले आहे. त्याचे भुमीपुजन मा. मुख्यमंत्री यांचे शुभहस्ते करण्यात आले होते. परंतु सदर जागेचा सरकारी वाद निर्माण झाल्याने सदरचे बांधकाम आजमितीपर्यंत सुरु झालेले नाही. तसेच भविष्यात होईल किंवा नाही याची शाश्वती नाही. सदरचा प्रस्ताव कालबाह्य झाल्याने नविन प्रस्ताव मंजुर करताना त्याठिकाणी काय व कसे बांधकाम करावे किंवा सदर जागा मोबदला देवून ताब्यात घेण्याबाबतचे संपूर्ण अधिकार खालीलप्रमाणे समिती गठीत करुन समितीला देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | अध्यक्ष |
| २. | मा. उप-महापौर, | सदस्य |
| ३. | मा. स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | मा. सभागृह नेते, | सदस्य |
| ५. | मा. आयुक्त | सदस्य सचिव |

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी.

याबाबत जर त्या जागेचा वाद मिटल्यास सदर जागेबाबत विकासकास टी.डी.आर. मोबदला देवून सदर जागेमध्ये काय बांधता येईल किंवा जागा कशी ताब्यात घेता येईल याबाबत सदर समिती निर्णय घेईल.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता महापालिकेचे नविन अद्यावत असे मुख्यालय बांधणेकरीता आरक्षण क्र.२६४ याठिकाणी मा. आयुक्त यांनी नकाशा व आराखडा तयार करुन मा. महासभेची मंजुरी घेण्याकरीता प्रस्ताव सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर झाला आहे.

**प्रकरण क्र. ३५ :-**

**महानगरपालिका नविन मुख्य कार्यालय इमारत बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे**.

**ठराव क्र. ३२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने यापूर्वी सर्व्हे क्र./हिस्सा क्र.११४/१,२, ११३/१,२,४, जुना ४८१/पै.पै, ४७८/पै.,पै.,पै. याठिकाणी मुख्य कार्यालयाची इमारत बांधणेकामी यापूर्वीच दि.२१/१०/२०१५ ने बांधकाम प्रारंभ पत्र दिलेले आहे. त्याचे भुमीपुजन मा. मुख्यमंत्री यांचे शुभहस्ते करण्यात आले होते. परंतु सदर जागेचा सरकारी वाद निर्माण झाल्याने सदरचे बांधकाम आजमितीपर्यंत सुरु झालेले नाही. तसेच भविष्यात होईल किंवा नाही याची शाश्वती नाही. सदरचा प्रस्ताव कालबाह्य झाल्याने नविन प्रस्ताव मंजुर करताना त्याठिकाणी काय व कसे बांधकाम करावे किंवा सदर जागा मोबदला देवून ताब्यात घेण्याबाबतचे संपूर्ण अधिकार खालीलप्रमाणे समिती गठीत करुन समितीला देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | अध्यक्ष |
| २. | मा. उप-महापौर, | सदस्य |
| ३. | मा. स्थायी समिती सभापती | सदस्य |
| ४. | मा. सभागृह नेते, | सदस्य |
| ५. | मा. आयुक्त | सदस्य सचिव |

विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाल्यावर त्यांची या समितीमध्ये सदस्य म्हणून नोंद घेण्यांत यावी.

याबाबत जर त्या जागेचा वाद मिटल्यास सदर जागेबाबत विकासकास टी.डी.आर. मोबदला देवून सदर जागेमध्ये काय बांधता येईल किंवा जागा कशी ताब्यात घेता येईल याबाबत सदर समिती निर्णय घेईल.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता महापालिकेचे नविन अद्यावत असे मुख्यालय बांधणेकरीता आरक्षण क्र.२६४ याठिकाणी मा. आयुक्त यांनी नकाशा व आराखडा तयार करुन मा. महासभेची मंजुरी घेण्याकरीता प्रस्ताव सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्री. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभा संपली असे मी जाहिर करते.

**(सभा संपल्याची वेळ दु. ०१.०७ वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका